बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १७८ वा । मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### शटरचे लॉक तोडून दुकानातील मालाची केली चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शुभम श्रीकांत संगवे, वय २६ वर्षे, रा. कल्पना नगर कळंब ता.कळंब जि. धाराशिव यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी मार्केट शॉप नं ३७ चे शटर अज्ञात व्यक्तीने दि.१८.०९२०२५ रोजी उचकटुन शटरचे लॉक तोडून दुकानातील पॅराशुट तेलाच्या १०५ बॉटल,विविध कंपनीचे अंगाचे साबन २४३ नग, सोयाबीनचे तेलाचे १५ लिटरचे ३ डब्बे, सुर्यफुल तेलाचे ३ डब्बे, रोख रक्कम १०,००० असा एकुण ३७,३३२ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शुभम संगवे यांनी दि.२०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१ (४), ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### घरातील साफसफाईचे काम करणाऱ्या दोघींनी केली सोन्याच्या दागिण्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अश्विनी प्रसाद धर्म, वय ४० वर्षे, रा. साधक चाईल्ड केअरच्यावर शंकर नगर धाराशिव यांचे घरातील साफसफाईचे काम करणाऱ्या कमल , बबीता दोघी रा.मुक्तेश्वर कॉलनी धाराशिव यांनी दि.१५.०८.२०२५ रोजी अश्विनी धर्म यांचे घरातुन १५२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ४,५०,००० किंमतीचे चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अश्विनी धर्म यांनी दि.२०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०६, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तिन चाकी मालवाहतुक वाहनाची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी फयाज गफार बागवान, वय ४२ वर्षे, रा.खाजानगर गल्ली नं २१ धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे बजाज मॅक्जीमा कारबो तिन चाकी मालवाहतुक वाहन वर एकुण ३,५०,००० किंमतीचे यावर चालक म्हणून काम करणारा शिबु रा. शांती नगर भिवंडी ह.मु. उमर मोहल्ला धाराशिव यांनी चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-फयाज बागवान यांनी दि.२०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॅक्टर ट्रॉलीच्या चाकाची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अमोल अंकुश लोमटे, वय ३५ वर्षे, रा. गोवर्धनवाडी ता. जि. धाराशिव यांचे अंदाजे ४०,००० किंमतीचे ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचे ३ चाक हे दि. १५.०९.२०२५ रोजी गोवर्धनवाडी येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी कावळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## नवरात्र महोत्सवास उत्साहात सुरुवात
### तुळजापुरमध्ये भक्तिभावाच्या वातावरणात घटस्थापना



तुळजापूर (माध्यम कक्ष)- महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीजींच्या शारदीय नवरात्र महोत्सवास आज सोमवार, आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरुवात झाली.पहाटे पारंपरिक विधीनुसार देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली.

दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते मंत्रोच्चार,पारंपरिक वाद्यांचा गजर आणि आई राजा उदो-उदो च्या घोषणांत घटस्थापना विधी पार पडला.

**भाविकांची गर्दी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीक्षेत्र तुळजापूरनगरीत महाराष्ट्रासह कर्नाटक,तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातून हजारो भाविक दाखल झाले आहेत.पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने दर्शनासाठी भाविकांनी उपस्थिती दर्शवली.भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासन,पोलीस, नगरपरिषद,महसूल,आरोग्य, पाणीपुरवठा,सार्वजनिक बांधकाम व राज्य परिवहन महामंडळ यांच्याकडून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य केंद्रे,स्वच्छता,पिण्याचे पाणी आणि वाहतुकीवर विशेष लक्ष दिले जात आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

घटस्थापना सोहळ्यास आमदार तथा विश्वस्त राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, सौ. सौमय्याश्री पुजार,जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील,मंदिर संस्थानच्या तहसीलदार व व्यवस्थापक माया माने,पुजारी विनोद सोंजी (कदम), महंत तुकोजी बुवा,महंत चिलोजी बुवा,महंत बजाजी बुवा,महंत हमरोजी बुवा,महंत वाकोजी बुवा, पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम,विपिन शिंदे,अनंत कोंडो आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

**घटस्थापनेचे धार्मिक महत्व**

सिंहाच्या गाभाऱ्यात देवींजींच्या डाव्या बाजूला घट बसवला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी अर्पण केलेल्या जमिनीतील 'वावरी' माती घटस्थापनेसाठी आणली जाते. परंपरेनुसार तुळजापूरातील धाकटे कुंभार कुटुंबीयांकडून घट कलश येतो,ज्यात गोमुख व कल्लोळ तीर्थाचे पाणी भरलेले असते.तसेच शेटे कुटुंबीयांकडून सप्तधान्य अर्पण केले जाते.जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते घट प्रतिष्ठापित केला जातो आणि देवीची पहिली माळ (नागवेलीच्या पानांची) अर्पण केली जाते.

**नवरात्र उत्सवाचे स्वरूप**

पुढील नऊ दिवस तुळजापूरनगरीत भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळणार आहे.धार्मिक विधींबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून,हा उत्सव अध्यात्म,श्रद्धा आणि संस्कृतीचा संगम ठरणार आहे.

## ३७८ कोटी रुपये विमा भरपाई संदर्भात कंपनीविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री पिक विमा योजना २०२१ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात असलेल्या प्रकरणामध्ये निर्णय दिला असून यामध्ये बजाज अलाईन्स कंपनीने दिलेली विमा भरपाई योग्य असल्याचे ठरवले आहे. सदर निर्णय हा शेतकऱ्यांच्या हिताचा नसल्यामुळे आपण सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष नंदु राजेनिंबाळकर तसेच शेतकऱ्यांच्या वतीने याचीका कर्ते अनिल जगताप यांनी स्पष्ट केले.

सन २०२१ मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात विमा संरक्षण घेतले होते. परंतू तात्कालीन विमा कंपनी, बजाज अलाईन्सने केवळ ३७४ कोटी म्हणजे एकुण नुकसान भरपाई (७४८ कोटी) च्या ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आली होती. या संदर्भात दि. ३१/०५/२०२२ रोजी जिल्हास्तरीय तक्रार निवारण कमिटीकडे पहिली तक्रार करण्यात आली. या कमिटीने पिक विमा कंपनीस उर्वरीत सर्व रक्कम देणेबाबतचा निर्णय दिला. परंतू कंपनीने याकडे रितसर दुर्लक्ष केले. तद्नंतर दि. २२/०८/२०२२ रोजी सदर कंपनी विरोधात विभागीय तक्रार निवारण कमिटीकडे तक्रार करण्यात आली. या तक्रार निवारण कमिटीने जिल्हा तक्रार निवारण कमिटीचा निर्णय कायम ठेवला. कंपनीने उर्वरीत रक्कम वितरण करणेबाबत आदेशीत करण्यात आले. परंतू कंपनीने विभागस्तरीय तक्रार निवारण कमिटीचा निर्णय देखील बेदखल केला. तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी कंपनीने उर्वरीत देय रक्कम न दिल्या कारणाने आर.आर. सी.ची कारवाई केली.

यानंतर बजाज अलाईन्स कंपनीने आर.आर.सी. कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी यांना अधिकार नाहीत असे प्रतीपादन करत उच्च न्यायालयाकडे आर.आर.सी. कारवाई विरोधात याचीका दाखल केली. यानंतर दि. ३१/१०/२०२२ रोजी राज्यस्तरीय तक्रार निवारण कमिटीकडे उर्वरीत पिक विमा भरपाईच्या संदर्भामध्ये तक्रार दाखल करण्यात आली. तत्कालीन कृषी सचीव एकनाथजी डवले यांनी सदर प्रकरण उच्च न्यायालयात सुरु असून या संदर्भातील निकाल उच्च न्यायालयात सदर प्रकरण सुरु असल्यामुळे प्रतीक्षाधीन ठेवला.

सदर पिक विमा मंजुर करतेवेळेस शासनाच्या २१.५.१०.१नुसार प्रत्यक्षात नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. या पंचनाम्यामध्ये प्रत्यक्षात ६८ हे ८६ टक्के पर्यंत पिकांचे नुकसान ग्राहय धरण्यात आले होते. शासनाच्या नियमानुसार शेतकऱ्यांना पिक विमा कंपनीस नुकसान झाल्याची पुर्वसुचना देणे आवश्यक होते. त्यानुसार ३ लक्ष ४४ हजार ७०२ शेतकऱ्यांनी स्थानिक आपत्ती अंतर्गत कंपनीस शासनाच्या नियमानुसार १५ दिवस आगोदर पुर्वसुचना दिल्या होत्या.

शेतकऱ्यांनी नियमानुसार पुर्वसुचना देवून देखील कंपनीकडून पिक विमा मंजुर करतेवेळी उंबारठा उत्पन्न व प्रत्यक्ष पिक कापणी प्रयोग यातील उत्पन्न ग्राहय धरुन विमा वितरीत केला होता.

या विरोधात उच्च न्यायालयात रिट पिटीशन नं. ११९७३/२०२३ दाखल करण्यात आले होते. या प्रकरणावर निर्णय देताना उच्च न्यायालयाने धाराशिव जिल्हयातील खरीप हंगामातील संपुर्ण ४२ महसुल मंडळातील उत्पन्न हे उंबरठा उत्पन्नापेक्षा जास्त असल्याने सदर याचीकेत मागणी केल्याप्रमाणे उर्वरीत ३७४ कोटी रुपये नुकसान भरपाई देणेसंदर्भातील निकाल दि. १२/०९/२०२५ रोजी दिला असून उंबरठा उत्पन्नापेक्षा शेतकऱ्यांचे उत्पन्न जास्त आहे असे ग्राहय धरुन बजाज अलायन्स कंपनीसारखा निकाल दिला आहे.

या विरोधात आपण सर्वोच्च न्यायालयात जाणार असून शेतकऱ्यांची उंबरठा उत्पन्न व प्रत्यक्ष उत्पन्न हे कमी असताना देखील व कंपनी केवळ आर. आर.सी. संदर्भात जिल्हाधिकारी यांना अधिकार नसल्याचे कारण दाखवून न्यायालयात गेल्यामुळे तसेच सरकार न्यायालयात शेतकऱ्यांची बाजू मांडण्यास असमर्थ ठरले आहे. या सर्व गोष्टीमध्ये धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांच्या हक्काचे ३७८ कोटी रुपये नुकसान होणार असून आपण सर्वोच्च न्यायालय जाणार असल्याचे सुतोवाच खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केले.

## कलाकेंद्र चालविणाऱ्यावर गुन्हे दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- स्थानिक गुन्हे शाखा अंतर्गत पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे आदेशाने धाराशिव जिल्ह्यातील कलाकेंद्रवर कारवाई करणे कामी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दि.२०.०९.२०२५ रोजी रवाना होवून कलाकेद्रंवार छापे टाकले. सदर कलाकेंद्र चालक मालक वैभव धनंजय माळी, पिंजरा लावणी सांस्कृतीक लोकनाट्य कलाकेंद्र आळणी, रा. आळणी ता. जि. धाराशिव, नितीन विनायक चव्हाण, लोकनाट्य सांस्कृतीक कलाकेंद्र आळणी, रा. आळणी ता. जि. धाराशिव, सुदर्शन श्रीकृष्ण शेळके,गौरी लोकनाट्य कलाकेंद्र वडगाव, रा. येडशी ता. जि. धाराशिव,राजेंद्र माळी, रा. चोराखळी महाकलीका लोकनाट्य कलाकेंद्र ता. कळंब जि. धाराशिव, निर्मला मोहनराव जाधव, रा. परभणी ह.मु. चोराखळी कालीका कलाकेंद्र, ता. कळंब जि. धाराशिव यांनी कलाकेंद्राचा मॅनेजर या नात्याने मा. कार्यकारी दंडाधिकारी धाराशिव यांनी दिलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचा भंग करुन कलाकेंद्र चालवत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द येरमाळा व धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे ५ गुन्हे नोंदवले आहेत.

## तुळजापुर शारदीय नवरात्र उत्सवादरम्यान दरोडयाचे तयारीत असणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेचा दणका



धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधिक्षक श्रीमती. रितु खोखर, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांचे आदेशावरून सपोनि अमोल मोरे, सपोनि . सचिन खटके यांचे पथक तुळजापुर शारदीय नवरात्र महोत्सव दरम्यान मालाविषयी गुन्हयांस प्रतिबंध करणेकरिता तुळजापुर शहरात गर्दीचे ठिकाणी मिळाली की नळदुर्ग ते तुळजापुर जाणारे बायपास रोडवर एका पांढरे रंगाचे चारचाकी वाहनामध्ये काही इसम दरोडा टाकण्याचे तयारीत थांबलेले आहेत अशी माहिती मिळाल्याने लागलीच सदरची माहिती वरीष्ठांना सांगुन पथकामधील स्टाफ माहिती मिळालेल्या ठिकाणी नळदुर्ग ते तुळजापुर जाणारे बायपास रोडवर गेले असता तेथे त्यांना एक पांढरे रंगाची स्वीफट कार दिसली. पथकाने त्यांच्या गाडया थांबवुन गाडीमधुन उतरून सदर कारकडे जात असताना पथकामधील स्टाफला पाहुन कारमधील दोन इसम उतरून पळुन जाण्याचे तयारीत असताना त्यांना जागीच पकडले. तसेच कारमधील असलेले तिघांनाही पकडुन त्या पाच इसमाना त्यांचे नाव गाव व सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारले असता त्यांनी सुरवातील उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यांना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्या सर्वांनी आपली नावे रोहीत ऊर्फ तात्या अंकुश गायकवाड वय ३६ वर्षे रा. सुभाष कॉलनी बीड, अमर आसाराम गायकवाड वय २३ वर्षे रा. नळवंडी नाका बीड, राजेश अभिमान जाधव वय २७ वर्षे रा. चऱ्हाटा, ता. जि. बीड, राजाभाऊ ज्ञानदेव यादव वय २५ वर्षे रा. वांगी ता. जि. बीड, ५) प्रशांत दिलीप डाके वय २५ वर्षे रा. स्वराज्य नगर बीड असे सांगीतले. त्यांचे नावाची ई अभिलेखावरून पाहणी केली असता त्यांचेपैकी काही जणावर दरोडयाची तयारी, चोरी, खुन, असे मालाविषयीचे व शरीराविरुध्द चे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. नमुद इसमांचा संशय आल्याने त्यांचे सदर कारची पाहणी केली असता कारमध्ये दरोडा टाकण्याचे साहित्य एक लोखंडी धारदार कोयता मिळुन आला. त्या सर्वांना ताब्यात घेवुन त्यांचेवर तुळजापुर पोलीस ठाणे येथे गुरनं ३४९/२०२५ कलम ३१०(४), ३१० (५), भा.न्या. सं. तसेच शस्त्र अधि. ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. रितु खोखर व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि श्री. अमोल मोरे, सपोनि सचिन खटके, पोहेकॉ- विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, दत्ता राठोड, दया गादेकर, नितीन जाधवर, पोना - बबन जाधवर, मपोह- १३२७ शोभा बांगर, बीड स्थानिक गुन्हे शाखा येथील पोकॉ-४३८ यादव पोकॉ- १०५५ आंधळे, चापोह- महेबुब अरब, सुभाष चौरे, विनायक दहीहंडे यांचे पथकाने केली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## येरमाळा शिवारात अवैध गांजा लागवड करुन संवर्धन करणाऱ्या इसमावर येरमाळा पोलीसांची कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक २१ रोजी येरमाळा पोलीस स्टेशनचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक, भालेराव यांना गोपनिय माहीती मिळाली की, येरमाळा ता.कळंब जि.धाराशिव येथे एका इसमाने त्याचे घराचे पाठीमागे स्वता:च्या आर्थीक फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशिर रित्या गांज्याच्या झाडांची लागवड करुन त्याचे संवर्धन व जोपासना करीत आहे, अशी खात्रीलायक माहीती मिळाल्याने याबाबत .पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. पवार साहेब यांना माहीती देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करणे कामी माहीतीच्या ठिकाणी छापा मारला असता, येरमाळा येथील भावसाहेब येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव याने आपल्या राहत्या घराचे पाठीमागील मोकळ्या जागेत अवैध गांज्याचे झाडे लावुन त्याचे संवर्धन करीत असताना मिळुन आला. त्याचे घरामागून एकुण ९ किलो २०० ग्रॅम वजनाची ओलसर गांज्याची झाडे एकुण किंमत १,८४,००० किंमतीचा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर इसम यांचे विरुध्द येरमाळा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना मॅडम, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. पवार साहेब यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भालेराव, पोउपनि श्री भोजगुडे, श्री आवारे, पोहेकॉ- शेख, तिगाडे, पोना-सय्यद पोअं- पठाण, अमोल जाधव, चालक पोअं- दराडे यांचे पथकाने केली आहे.

## श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव २०२५ पोलीस बंदोबस्तात तैनात

धाराशिव (प्रतिनिधी)- श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव-२०२५ दि. २२.०९.२०२५ ते दि. ३०.०९.२०२५ पावेतो साजरा होत आहे. श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्यातुन लाखोंच्या संख्येने भाविक येतात. सदर नवरात्र महोत्सव कालावधीत तुळजापूर शहर व परिसरामध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते.
अशा वेळी गर्दीच्या ठिकाणी चोरी, जबरी चोरी, या सारखे गुन्हे घडू नये, भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारच घटना होवून कायदा व सुव्यसस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये या करीता मंदीर प्रशासन व धाराशिव पोलीस दला कडून मंदीर परिसर, गर्दीची ठिकाणे, चौक, पार्कींग व्यवस्था इतर ठिकाणी उउढत कॅमेरे बसविण्यात आले असुन उउढत कक्ष स्थापन करण्यात अले आहे.

तसेच श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव-२०२५ नवरात्र बंदोबस्त अनुषंगाने बाहेर जिल्ह्यातुन व धाराशिव जिल्ह्यातुन पुरविण्यात आलेला बंदोबस्त अपर पोलीस अधीक्षक ०२, पोलीस उप अधिक्षक १२, पोलीस निरीक्षक २१, सहा पोलीस निरीक्षक ३९, पोलीस उप निरीक्षक ४५, पुरुष पोलीस अमंलदार ८०५, महिला पोलीस अमंलदार २०४, ट्राफीक पोलीस अधिकारी ०७, पोलीस अंमलदार ५०, एस. आर. पी. एफ ०२ प्लाटून, होमगार्ड १२०० पुरुष व महिला होमगार्ड २०० असा बंदोबस्त पुरविण्यात आला आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जीएसटीमुळे समाधान लाभेल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहिर केल्याप्रमाणे २२ तारखेपासून जीएसटीमध्ये सुधारणा केली आहे. काही वस्तू जीएसटीतून वगळल्या आल्या असून दोन स्लॅब ठेवण्यात आले असल्याचे सांगितले जाते. पाच आणि आठरा टक्केच जीएसटीची आकारणी होणार आहे. यामुळे काही वस्तू स्वस्त होणार असून लोकांची खरेदी करण्याची क्रियशक्ती वाढणार आहे. आता देशातील जनता खरेदी करण्यासाठी बाहेर पडणार आहेत. मुळात आठ्ठावीस टक्के वरून आठ्ठराटक्के जीएसटीकर लागणार आहे. ज्याबाबी स्वस्त होणार किंवा महाग होणार याची यादी जाहीर केली आहे. त्यात प्रामुख्याने मोबाईल, लॅपटॉप, कार तसचे दोनचाकी आदिंचा समावेश आहे. मुळात एक बाब लक्षात घेतली पाहिजे. जे पंतप्रधान यांनी बोलले ते करून दाखविले आहे. आज देशातील परिस्थितीचा अंदाज घेणे अपेक्षित होते कारण देशातील जनतेची आर्थिक स्थिती तसेच जीवनमानाचा विचार सतत करणे अपेक्षित आहे. सर्वजनच श्रीमंत आहेत, अशातला भाग नाही. अनेक गरीबही आहेत. काही बोटावर मोजण्याइतकी मंडळींना रात्रीचे पोटभर भोजन मिळते का नाही याचा विचार केला जात नाही. मुळात जीएसटी कर प्रणाली देशात नव्हती. काही कर होते. ते रद्द करून सुटसुटीतपना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. करात पाच, बारा, आठरा, आठ्ठावीस टक्के आदि असताना आता पाच आणि आठरा टक्केच स्लॅब ठेवण्यात आला आहे. त्यामुळे सुटसुटीतपना निर्माण होवू शकतो. ज्या काही प्रथमदर्शी बाबी दिसून येतात त्यानुसार पुर्वी होत्याच ते कमी केल्याचे दिसून येते. अठ्ठावीस टक्केकरात किती वस्तू होत्या. आज आठरा टक्क्यात आणल्या आहेत. आज काही बाबतीत असे दिसून येत दहा टक्के दर कमी केले तर काही चालाख कंपन्या आपल्या मुळ दरात दहा टक्के वाढ करून पुर्वीच्या आहेत त्या किंमतीत विकण्यासाठी सज्ज दिसून येतात. त्यांच्या किंमती कमी करण्याचा अधिकार तसा कोणाला आहे? सरकार करात सवलत देऊ शकेल मात्र दरात बाबत ढवळाढवळ करेल असे वाटत नाही. आज मोबाईल, गाड्या खरेदी करण्यात पुढे ज्यांची एपत आहेत तेच पुढे येतील. गोरगरीब आपली हौस भागविण्यासाठी जुनी, वापरलेली गाडी घेतील, नव्याच्या नादात जातील असे वाटत नाही. त्यामुळे आज जे दर कमी होतील असे भाकित केले जाते याचा परिणामा नंतर भाष्य करणे योग्य ठरणारे आहे. मुळात व्यापारी, उद्योगपती हुशार असतात, आपल्याला नफा पुर्वी एवढा मिळाला पाहिजे असाच विचार करतात. त्याच प्रमाणे फारपुर्वी जिचकार जे मंत्री होते, अतिहुशार होते त्यांची काही उदा. देऊन सांगितले की, एक गाडी दोनचाकी तयार करण्यासाठी चाळीस-पन्नास हजार रुपये लागतात तेच ग्राहकाकडून लाखाच्या आसपास घेतले जाते यावर काही निर्बंध कोणी घालू शकत नाही. आज दराच्या विक्रीवर कर लागतो. विक्री अधिक तेवढा जनसमान्याकडून कर आकारला जातो. त्यामुळे आज जरी आठ्ठावीस वरून आठरा टक्के केले किंवा सिंमेंट कमी केले तरी व्यापारी सध्याच्या दरात कमी करतील का? या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. या नव्या कर प्रणालीत शेतकऱ्यास कोणती मदत मिळेल ते पाहाणे आवश्यक आहे. शेतकऱ्यास पुर्ण करातून वगळेले तर आज शेतीसाठी औषधे व खते लागतात. याबाबत विचार होणे अपेक्षित आहे. सरकारने स्वालंबन व स्वदेशींला चालना देण्याचे सुत्र जाहिर केले याचे स्वागत होणे अपेक्षित आहे ते होणार आहे. कारण स्वालंबन व स्वदेशी हे महत्वाचे पाऊल आहे. ते होणे आवश्यक होते. आज ज्या काही बाबतीत वाढविलेले दर कमी होणे अपेक्षित आहे. एकतर शेतकऱ्याच्या मालास भाव नाही तो ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यास नाही. शेत मालकास नाही. इतर बाबतीत जेवढ्या काही वस्तू असतील. पनीर, बटर, दोन किंवा चार चाकी गाड्याचे दर हा उत्पादक-मालक ठरवितात. तसा अधिकार शेतकऱ्यास नाही. सोयाबिनच दर सरकार ठरविते. जेवढा खर्च उत्पादनास लागतो. तेवढा देखिल निघत नाही. घाट्यात शेती आहे हे उघड दिसून येते. मुळात कोणते का किंवा कोणत्याही पक्षाचे सरकार असो पहिल्यांदा शेतकऱ्याचे हीत जोपासले पाहिजे. चीन आज पुढे कसा गेला या बाबत चिंतन केले तर लक्षात येते ते म्हणजे पहिल्यादा शेतकऱ्याचे हीत त्यांनी जोपासले. तसे भारतात का होत नाही. पहिल्यांदा शेतकऱ्याचे हीत जोपासले पाहिजे. त्यांना त्यांच्यामालाचा भाव ठरविण्याचा अधिकार देता येत नसला तरी योग्य हमी भाव दिला पाहिजे. तरच शेती व शेतकरी जीवंत राहू शकेल, किंबहुन देशाची प्रगती होऊ शकेल. जीएसटी आठ्ठावीस टक्क्याहुन आठरा टक्के केली, काही पाच टक्क्याची आकारणी देसून येते. तर पाच टक्क्यावर शुन्य टक्के आकारणी होताना दिसून येत आहे. याचा परिणाम आताच देसून येणार नाही तर कालांतराने दिसून येणार आहे. आताच गाड्या दोन किंवा चार चाकी किंवा मोबाईलच्या खरेदीसाठी रांगा लागतील असे नाही. खायला सुकामेवा आदि सर्रास लागतात असे नाही. त्यापेक्षा मुळ अन्नधान्य, दररोजच्या अतिजीवनाश्यक वस्तू त्या माफक झाल्या पाहिजेत. यात कोणाचेही दुमत असण्याची गरज नाही. ज्याबाबी अतिआवश्यक आहेत. सर्वसामान्यांना लागतात. त्याशिवाय पर्याय नाही अशा बाबी स्वस्त बिनाटॅक्स असल्या पाहिजेत. अगोदर अधिक लावणे पुन्हा कमी करणे किंवा अगोदर घेणे नंतर परत देणे हे सुत्र योग्य नाही. पुर्वी अधिक लावणे पुन्हा कमी करून परत देणे, वापस करणे याला काही अर्थ नसतो. त्यामुळे जनतेनी आता ओळखुन आर्थिक नियोजनाची गरज आहे. जेवढ्या गरजा अपेक्षित आहेत तेवढाच खर्च करणे योग्य जीवनात ठरणारे आहे. त्यामुळे यापुढेही शेती व शेतकऱ्यासाठी सतत देणे व त्यांची आर्थिकस्थिती सुधारण्यासाठी सतत प्रयत्नाची मोठी गरज आहे. पुर्वीचा कर कमी करणे किंवा ज्यावस्तूला कर लावणे योग्य नव्हते ते करमुक्त करणे याला काही अर्थ असतो का यावर चिंतन होणे अपेक्षित आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम - भारतीय स्वातंत्र्याचा दुसरा लढा या विषयावरील परिसंवादास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद

### तत्कालीन स्टेट काँग्रेससह आर्य समाज, हिंदू महासभा रा. स्व.संघाबरोबरच राष्ट्रीय शिक्षण संस्थांचे महत्वपूर्ण योगदान



**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था शाखा लातूर आणि नवनिर्माण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात मराठवाडा मुक्तिसंग्राम - भारतीय स्वातंत्र्याचा दुसरा लढा या विषयावरील परिसंवादास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या लढ्यात तत्कालीन स्टेट काँग्रेस सोबतच आर्य समाज, हिंदू महासभा - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय शिक्षण संस्था यांचे योगदान अतिशय महत्वाचे होते, हा मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या या परिसंवादाचा मुख्य केंद्रबिंदू होता.

मराठवाड्यातील सर्वसामान्य नागरिकांनी निजामाविरुद्धच्या संघर्षात सहभागी होऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला दि. १७ सप्टेंबर १९४८ ला मुक्त केले. सन १९११ ते १९४८ या कालावधीत हा लढा चालू होता. या लढ्यात समाजाच्या विविध स्तरातील नागरिकांनी आपले योगदान दिले. या संघर्षात विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संघटनांचे मौलिक योगदाळ लाभले. सर्वांच्या अथक परिश्रमातून मिळालेले हे स्वातंत्र्य आपल्या व पुढील पिढीला प्रेरणादायी व्हावे म्हणून त्याबाबतचे स्मरण व सिंहावलोकन करण्याच्या उद्देशानेया परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे उदघाटन जिल्हाधिकारी वर्षा घुगे - ठाकूर यांच्या करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मणराव ( आबा ) रेड्डी हे होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन , व्यंकटेशराव महाजन महाविद्यालय, धाराशिवचे प्राचार्य प्रशांत जोशी, नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, श्री केशवराज शैक्षणिक संकुल,लातूरचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी, सचिव शैलेश कुलकर्णी, नवनिर्माण प्रतिष्ठानचे अशोक शिवणे, महेंद्र जोशी, संजय गुरव आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

या परिसंवादाच्या उदघाटक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा हा केवळ एक लढा नसून त्याग - समर्पणाचे मूर्तिमंत प्रतिक असल्याचे सांगितले. प्रत्येक लढ्याची काही वैशिष्ट्ये असतात. त्याप्रमाणे या लढ्याचीही आहेत. या लढ्यात सर्वांचा हिरीरीने सहभाग होता. या लढ्याचे मुख्य स्रोत लातूर होते, ही बाब अतिशय महत्वाची आहे. या लढ्याचा इतिहास भावी पिढीला समाजाने आवश्यक आहे. त्याकरिता या लढ्यासंबंधी अधिकाधिक पुसतक, ग्रंथ लिहिले गेले पाहिजेत. लातूर जिल्हा प्रशासनाने ही एक ग्रंथ प्रकाशित केला असून जिल्ह्यात येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींना त्याच्या प्रति भेट स्वरूपात देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. या लढ्याचा इतिहास आजही अनेकांना माहिती नाही. हा इतिहास पुढील पिढीपर्यंत प्रभावी शब्दात पोहोचविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या ऐतिहासिक विषयावरील परिसंवादाच्या माध्यमातून विचारांची देवाण घेवाण चांगल्या पद्धतीने होते, असे सांगून मराठवाडा म्हटले की, केवळ मागासलेपण असे न म्हणता मराठवाड्याच्या विविधतेचेही वर्णन तेवढ्याच सक्षमपणे होणे आवश्यक असल्याचे ठाकूर यांनी सांगितले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी यावेळी मार्गदर्शन करताना या लढ्याच्या माध्यमातून आपल्या पूर्वजांनी केलेले बलिदान, त्याग भावी पिढीने समजून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. या लढ्याच्या १९३८ ते १९४८ पर्यंतचा घटनाक्रम त्यांनी आपल्या वक्तव्यातून कथन केला. सर्वांच्या त्याग, समर्पण आणि बलिदानाचे फलित म्हणजे दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला,असेही डॉ. महाजन यांनी सांगितले. प्राचार्य प्रशांत चौधरी यांनी आपल्या मनोगतात इतिहासात डोकावून पाहण्याचे महत्व अतिशय प्रभावी शब्दात नमूद केले. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्यात समाजातील विविध घटकांबरोबरच दलित, बहुजनांचे योगदानही अतुलनीय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास त्याग, बलिदानाचा असल्याचे सांगतानाच या परिसंवादाच्या माध्यमातून प्रवीण सरदेशमुख यांनी अत्यंत दुर्लक्षित विषय सर्वांसमोर आणल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात लक्ष्मणराव (आबा) रेड्डी यानिकल कोणताही असो, विघातक शक्ती ठेचून काढण्यासाठी राष्ट्रभक्तांनी सदैव तत्पर राहिले पाहिजे असे स्पष्ट केले. अशा प्रकारची परिस्थिती भविष्यात पुन्हा उदभवता कामा नये यासाठीही सर्वतोपरी प्रयत्न आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. माधवराव पाटील टाकळीकर यांनी हा विषय प्रत्येकाच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारा असल्याचे सांगितले. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा विषय विद्यापीठाने संशोधनपर विषय म्हणून अभ्यासक्रमात सहभागी करून ग्यायला हवा,अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे विस्तृत असे प्रास्ताविक प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिका आणि महत्व विशद केले. कार्यक्रमास महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या सर्व शाळा - महाविद्यालयांचे शिक्षक - प्राध्यापक, केशवराज शैक्षणिक संकुलाचे शिक्षक - शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या परिसंवादास अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

# सारोळा तालुका औसा येथे ८७ समता सैनिकांचे प्रशिक्षण शिबिर



**लातूर/प्रतिनिधी :** बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाला २०२७ मध्ये शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. हे औचित्य साधून महाराष्ट्रामध्ये एक लाख सैनिक निर्माण करून बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्याचे मनोदय भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आद. डॉ. भीमराव साहेब आंबेडकर यांनी संकल्प व्यक्त केला आहे. त्या धर्तीवर औसा तालुका शाखेच्या वतीने सारोळा येथे २१ सप्टेंबर, २०२५ रोजी विश्वशांती बुद्ध विहार सारोळा ता. औसा जि. लातूर येथे एक दिवसीय तालुका स्तरीय समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबिर आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत चालले यामध्ये लाठी, काठीसह इतरही प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य संघटक तथा लातूर जिल्हा प्रभारी आयु. प्रा. बापूसाहेब गायकवाड सर यांच्या हस्ते संपन्न झाले. जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे सरचिटणीसावी म्हणून लामतुरे व असिस्टंट लेफ्टनंट जनरल आयु. राजाराम साबळे यांनी मार्गदर्शन केले, डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, कंपनी कमांडर नानासाहेब आवाड, जिल्हा सचिव देवराव जोगदंडे यांनी प्रशिक्षण दिले. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष आयुनि. कविताताई कांबळे यांनी कालाम सुत्त या विषयावर धम्म प्रवचन दिले तर औसा तालुकाध्यक्ष आयु. कैलास सोनकांबळे अध्यक्षस्थानी होते. कोषाध्यक्ष मारुती कांबळे येळीकर यांनी सूत्रसंचालन केलं, तालुका सरचिटणीस दिलीप बौद्धवीर, समता सैनिक दल औसा तालुकाप्रमुख श्याम सुरवसे, सचिव रंगनाथ कांबळे, औसा महिला तालुकाध्यक्ष आयुनि. कीर्तीताई कांबळे, शाखा अध्यक्ष इस्माईलकांत लोखंडे, ८७ उपासक उपासिका युवक युवती यांनी समता सैनिक दल प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभाग नोंदवला आहे. यावेळी सारोळा, भादा व औसा तालुका चे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रकाश लोखंडे, निखिल लोखंडे, प्रकाश कांबळे विशाल वाघमारे दयानंद गायकवाड या सर्वांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी संपन्न केला.

# आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन : संवाद व समानतेचा नवा मार्ग

मानव समाजाचा पाया संवादावर आधारलेला आहे. मानवाच्या जीवनात संवादाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संवादाशिवाय समाजजीवनाची कल्पना करणे अशक्य आहे. भाषा ही फक्त विचार व्यक्त करण्याचे साधन नसून ती समाजातील परस्परसंबंधांची, सांस्कृतिक अभिव्यक्तीची आणि ओळखीची मूलभूत गरज आहे. भाषा ही फक्त बोलली जाणारी किंवा लिहिली जाणारी साधनं नसतात, तर ती समाजाला जोडणारे, विचारांना दिशा देणारे आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे सामर्थ्यवान माध्यम असते. जगातील प्रत्येक समाजाने आपल्या गरजेनुसार वेगवेगळ्या भाषांची निर्मिती केली आहे. परंतु जगातील काही व्यक्तींना सर्वांना बोलण्याची किंवा ऐकण्याची क्षमता समान प्रमाणात लाभलेली नसते. अशा व्यक्तींना समाजाशी नाळ जोडण्यासाठी जी विशेष भाषा विकसित झाली, तिला आपण सांकेतिक भाषा असे म्हणतो. ही भाषा केवळ हातवारे किंवा हावभाव नसून ती एक स्वतंत्र व्याकरण आणि संरचना असलेली समृद्ध भाषा आहे. बहिऱ्या व्यक्तींसाठी सांकेतिक भाषा हीच जगण्याची भाषा ठरते. त्यामुळे सांकेतिक भाषेचा स्वीकार व प्रसार हा केवळ भाषिक प्रश्न नसून सामाजिक न्याय, समानता आणि समावेशक विकासाशी निगडित आहे. या भाषेच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी आणि जगभरातील बहिऱ्या व्यक्तींच्या भाषिक व सांस्कृतिक अधिकारांना मान्यता देण्यासाठी दरवर्षी २३ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन' साजरा केला जातो.

२०१७ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने या दिनाची घोषणा केली. ही तारीख निवडण्यामागे विशेष कारण आहे ते म्हणजे १९५१ साली याच दिवशी जागतिक बहिरे महासंघाची स्थापना झाली होती. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व लाभले आहे. या दिवसाचा उद्देश जगातील सर्व बहिरे व्यक्तींना शिक्षण, नोकरी, आरोग्य, न्याय, सांस्कृतिक सहभाग यांसारख्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात समान संधी मिळावी. 'कोणीही व्यक्ती मागे राहू नये' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हा या दिवसाचा केंद्रबिंदू आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करण्याचा अधिकार आहे. परंतु संवाद साधण्यासाठी जर आवश्यक माध्यमच नसेल, तर तो व्यक्ती उपेक्षित राहतो. सांकेतिक भाषा ही दरी भरून काढते आणि संवाद व समानतेचा नवा मार्ग उभारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, कोणतीही भाषा ही फक्त संवादाचे साधन राहत नाही; ती सामाजिक संरचनेत व्यक्तीच्या स्थानाचे, अधिकारांचे आणि सामूहिक ओळखीचे प्रतिक बनते. म्हणूनच सांकेतिक भाषेला मान्यता देणे म्हणजे बहिऱ्या समाजाच्या अस्तित्वाला आणि त्यांच्या सांस्कृतिक ओळखीला मान्यता देणे होय.

समाजशास्त्रातील संरचनात्मक प्रकार्यवाद या दृष्टिकोनातून पाहता, प्रत्येक समाजातील घटकाची भूमिका ठरलेली असते. भाषा हा घटक समाजाच्या एकात्मतेसाठी अत्यावश्यक आहे. परंतु जेव्हा एखाद्या गटाला म्हणजेच येथे बहिऱ्या समाजाला सामान्य भाषेपासून वंचित ठेवले जाते, तेव्हा त्यांचा समाजातील सहभाग मर्यादित होतो. यामुळे समाजाच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. म्हणूनच सांकेतिक भाषेचा प्रसार हा फक्त त्या गटाच्या फायद्यासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाच्या संतुलनासाठी आवश्यक आहे. संघर्ष सिद्धांत देखील या संदर्भात महत्त्वाचा आहे. समाजातील संसाधनांचे व अधिकारांचे वितरण हे नेहमीच समसमान नसते. बहिरे व्यक्ती ऐकणाऱ्या बहुसंख्याक समाजाच्या तुलनेत दुय्यम ठरतात. शैक्षणिक संस्था, रोजगारक्षेत्र, न्यायव्यवस्था, आरोग्यसेवा या सर्व ठिकाणी त्यांना संवादातील अडथळ्यांमुळे समान संधी मिळत नाही. ही असमानता केवळ शारीरिक मर्यादेमुळे नाही, तर सामाजिक रचनेमुळे टिकून राहते. सांकेतिक भाषेला अधिकृत मान्यता मिळाली तर या असमानतेत घट करता येईल. प्रतीकात्मक आंतरक्रीयावाद या दृष्टिकोनातून विचार केला तर भाषा म्हणजे फक्त माहिती देण्याचे साधन नाही, तर सामाजिक परस्परसंवादाची किल्ली आहे. एखाद्या बहिऱ्या मुलाच्या दैनंदिन जीवनाचा विचार केला तर त्याला घरात, शाळेत, समाजात संवाद साधणे कठीण जाते. त्याचे स्वतःचे अनुभव, भावना व्यक्त करणे कठीण बनते. त्यामुळे त्याची सामाजिक ओळख दुय्यम ठरते. जेव्हा त्याला सांकेतिक भाषेत संवाद साधता येतो, तेव्हा त्याची सामाजिक भूमिका दृढ होते आणि आत्मसन्मान वाढतो.

शैक्षणिक क्षेत्रात पाहिले तर सामाजिक भांडवल सिद्धांत उपयुक्त ठरतो. जेव्हा मुलांना समान शैक्षणिक संसाधने मिळत नाहीत, तेव्हा त्यांची सामाजिक भांडवल साठवण्याची क्षमता कमी होते. बहिऱ्या मुलांना सांकेतिक भाषेत दर्जेदार शिक्षण दिले गेले, तर ते पुढे उच्च शिक्षण, रोजगार आणि सामाजिक नेतृत्वात सहभाग घेऊ शकतात. त्यामुळे समाजात समान संधी आणि सामाजिक गतिशीलता वाढेल. बहिऱ्या समाजाला अनेक वर्षे शिक्षणापासून दूर ठेवले गेले. कारण त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासपद्धती, शिक्षकांची प्रशिक्षण व्यवस्था, शैक्षणिक साधनसामग्री यांची कमतरता होती. परंतु आज परिस्थिती हळूहळू बदलत आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये सांकेतिक भाषेला अधिकृत मान्यता मिळाली आहे. संयुक्त राष्ट्र संघानेही हे स्पष्ट केले आहे की, सांकेतिक भाषा ही पूर्ण भाषा आहे आणि तिचा प्रसार व वापर वाढविण्यासाठी सरकारांनी ठोस धोरण आखले पाहिजे. सांस्कृतिक समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता, सांकेतिक भाषा ही बहिऱ्या समाजाची सांस्कृतिक ओळख आहे. त्यांच्या साहित्यनिर्मिती, कलाविष्कार, नृत्य, नाट्य या सर्व गोष्टींमध्ये सांकेतिक भाषेचा सहभाग दिसून येतो. त्यामुळे या भाषेला मान्यता नाकारणे म्हणजे त्यांच्या संस्कृतीला नाकारणे होय. म्हणूनच जगातील अनेक देशांनी सांकेतिक भाषेला घटनात्मक मान्यता दिली आहे. भारतातही ''इंडियन साइन लँग्वेज रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर'' द्वारे प्रयत्न होत आहेत, परंतु त्याचा विस्तार आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाने या क्षेत्रात नवे दालन उघडले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने भाषांतर करणारी उपकरणे, मोबाईल ॲप्स, ऑनलाइन शिक्षण साधने उपलब्ध होत आहेत. यामुळे संवादातील अडथळे काही प्रमाणात दूर झाले आहेत. पण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, फक्त तांत्रिक साधनं पुरेशी नसतात. जोपर्यंत सामाजिक मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत समावेशक समाज उभा राहत नाही. बहिरे नागरिकांना 'अक्षम' म्हणून पाहण्याची वृत्ती बदलून त्यांना 'समान हक्काचे नागरिक' म्हणून मान्यता देणे हे खरी सामाजिक प्रगतीचे लक्षण आहे. समाजशास्त्रात मानवी हक्कांचा दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, रोजगार, आरोग्य, संस्कृतीत सहभाग या सर्व हक्कांचा लाभ मिळाला पाहिजे. जर संवाद साधण्यासाठी मूलभूत साधनच उपलब्ध नसेल, तर हे हक्क केवळ कागदावर राहतात. सांकेतिक भाषा या हक्कांना वास्तवात आणते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन हा मुळात मानवी हक्कांचा, सामाजिक न्यायाचा आणि समानतेचा दिवस आहे.



भारतातील परिस्थिती विशेष लक्षवेधी आहे. अनेक मुकबधीर नागरिक भारतात आहेत. परंतु अजूनही ग्रामीण व शहरी भागांमध्ये संवादाची दरी मोठी आहे. शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, शैक्षणिक साहित्याचा अभाव, सार्वजनिक ठिकाणी सांकेतिक भाषेची सोय नसणे, न्यायालयीन प्रक्रियेत दुभाष्यांची अनुपस्थिती यामुळे बहिरे नागरिक समाजजीवनात पूर्ण सहभाग घेऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन हा केवळ औपचारिक उत्सव न राहता सामाजिक जागरूकतेचे आंदोलन ठरले पाहिजे. या पार्श्वभूमीवर समाजाने काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये ऐच्छिक विषय म्हणून सांकेतिक भाषा शिकवावी. सरकारी कार्यालये, न्यायालये, रुग्णालये, रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणी दुभाष्यांची सोय असावी. माध्यमांनी सर्व कार्यक्रमांसाठी सांकेतिक भाषेतील अनुवाद उपलब्ध करून द्यावा. समाजातील सामान्य नागरिकांनीही या भाषेचा अभ्यास करून मुकबधीर समाजाशी संवाद साधण्याचा प्रयत्न करावा. आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन आपल्याला सतत हे स्मरण करून देतो की 'समावेशक समाज हा केवळ आर्थिक विकासावर उभा राहत नाही, तर संवादाच्या समान संधींवर उभा राहतो.' समाजातील कोणत्याही घटकाला वगळून लोकशाही पूर्णत्वाला पोहोचत नाही. म्हणूनच या दिवसाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधिक अधोरेखित होते.

शेवटी असे म्हणता येईल की, आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणजे केवळ एका भाषेचा गौरव नव्हे, तर सामाजिक समता, सांस्कृतिक ओळख, मानवी हक्क आणि समावेशक विकासाचा सेतू आहे. जोपर्यंत समाजातील प्रत्येक नागरिकाला आपले विचार व्यक्त करण्याची व समाजजीवनात सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळत नाही, तोपर्यंत खरी लोकशाही साकार होणार नाही. सांकेतिक भाषेचा स्वीकार हा त्या दिशेने टाकलेला महत्वाचा टप्पा आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

# नुसती पूजा नको, सन्मानही हवा

रमा सरोदे, प्रसिद्ध विधिज्ञ

नवरात्रीचे दिवस अनेकार्थाने महत्त्वपूर्ण असतात. यामागे पौराणिक कथा आहेत, सामाजिक संकेत आहेत, बदलत्या ऋतुमानाचा विचार आहे आणि त्याचबरोबर हा महिलांच्या शक्तीचा गौरव आहे. समाजचक्राचे एक अंग असणाऱ्या सामर्थ्याची ही उपासना आहे. मात्र एकीकडे देवीची पूजा करणारा समाज आज महिलांबाबत कमालीचा असंवेदनशील दिसतो. स्त्रीप्रश्न गंभीर रूप घेत आहेत. तेव्हा या उत्सवाचा अर्थ लावायचा कसा?

नवरात्रीच्या पावन पर्वाची सुरुवात म्हणजे स्त्रीशक्तीला केलेले वंदन आहे. घराघरांमध्ये नऊ रात्री आणि नऊ दिवस सुरू राहणारा हा महोत्सव महिलेचे समाजातील उन्नत स्थान आणि महात्म्य अधोरेखित करणारा आहे. आता तर घरे आणि राऊळांच्या बरोबरीने रस्तोरस्ती याचे साजरीकरण बघायला मिळते. मात्र एकीकडे असे असूनही समाजामध्ये स्त्रियांची विदारक स्थिती लपून राहिलेली नाही. महिला प्रश्नाचे स्वरूप अधिकाधिक गहन होत असल्याचे वास्तव जळजळीत आहे. म्हणूनच आदिमाया शक्तीची उपासना करणाऱ्या समाजाने याची दखल घ्यायला हवी. गेल्या वर्षभराचा आढावा घेतला, तर कोलकात्यातील बलात्काराची घटना कामाच्या ठिकाणी महिला सुरक्षित नसल्याचे दाखवून गेली. या केसमधून यासंबंधीचे वेगवेगळे कंगोरे लक्षात आले. टॉलिवूडच्या संदर्भात जस्टीस हेमा यांचा अहवाल आला आणि बदला घेण्याची वाढती प्रवृत्ती बघायला मिळाली. आपल्यावर झालेला अन्याय, अत्याचाराबद्दल उघडपणे कोणी बोलले तर अत्याचारी मानसिकता बदलत नाही, तर अधिक आक्रमक होते, हे या अहवालाने दाखवून दिले. (आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचणाऱ्या अभिनेत्रींना काम न मिळण्याच्या तेथील घटना समोर आल्याखेरीज ज्येष्ठ कलाकार अशा घटनांमध्ये सामील नसले तरी त्यांनी याविरुद्ध कोणतीही ठोस भूमिका न घेतानाही दिसले.)



खरे तर आपल्या कामाचे ठिकाण महिलांसाठी सुरक्षित करायचे असेल, तर प्रत्येकाने खंबीर भूमिका घ्यायला हवी. किमान भूमिका घेणाऱ्यांमागे खंबीरपणे उभे तरी राहायला हवे. मात्र तसे होताना दिसले नाही. म्हणूनच आजही याबाबत पहिले पाढे पंचावन्न अशीच स्थिती असून कायदा असूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याची खंत आहे.वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर हुंडाबळीचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आल्याचे आपण पाहिले. हुंडा मागणे, देणे आणि घेणे हा मुळातच गुन्हा आहे. मात्र असे असूनही लोकांचे गुन्हेगारीकरण सामान्यपणे स्वीकारले जात असल्याचे वास्तव यानिमित्ताने बघायला मिळाले. कारण कायदा असला तरी मुळात आपण हुंडापद्धती सांस्कृतिक दृष्ट्या स्वीकारली आहे. त्यामुळे कायदा असला तरी हुंडा देणारेही काही बोलत नाहीत, घेणारेही बोलत नाहीत आणि बघणारेही केवळ बघ्याची भूमिका घेतात. अशा प्रत्येक घटनेवेळी समाज गुन्हेगारी प्रवृत्ती सामान्य समजत स्वीकारत असतो. त्यामुळेच महिलांविषयक परिस्थिती पूर्वी होती तेवढीच आजही गंभीर आहे, असे म्हणावे लागेल.

असे असले तरी अलीकडचे न्यायालयाचे काही निकाल मात्र आश्वासक वाटतात. अलीकडेच महिलांच्या घरकामाला प्रतिष्ठा देण्याची भूमिका मद्रास उच्च न्यायालयाने मांडली. हे महत्त्वाचे वाटते, कारण महिलांचे घरकाम हे कधीच मुख्य काम समजले जात नाही. त्यातून पैसे मिळत नाहीत. मात्र घरकाम हे देखील नोकरीत केल्या जाणाऱ्या कामासारखे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केल्याची बाब नोंद घेण्याजोगी म्हणायला हवी. दुसरा स्त्रीधनाबद्दलचा निकाल महत्त्वाचा वाटतो. या निर्णयात महिलेचा तिच्या स्त्रीधनावर हक्क असून कितीही वर्षांनंतर ती स्त्रीधन मागू शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. यद्वारे कायद्याने स्त्रीला तिच्या धनाचे अभय मिळाले. मात्र असे अपवाद वगळले तर महिलाविषयक प्रश्न गुंतागुंतीचे होत असून अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसणे ही काळजीची बाब म्हणावी लागेल.सध्या आपण इंटरनेटच्या जगात वावरतो. तेव्हा त्याच्या प्रभावाच्या परिणामांचीही चर्चा झाली पाहिजे, कारण हा विषय 'प्रायव्हसी लॉ'च्या संदर्भात आहे. त्याचा वापर करून गैरव्यवहार, फसवणूक, छळ होण्याचे प्रमाण वाढते आहे. महिलाविषयक संवेदनशील माहिती मिळवत त्याचा गैरवापर करण्याचे प्रमाण तर नोंद घेण्याइतके वाढले आहे. काळजीची बाब म्हणजे अशा प्रकारची गुन्हेगारी समाजाच्या सर्व स्तरांवर वाढताना दिसत आहे.आम्ही वकीलमंडळी अनेक खटले हाताळतो. यानिमित्ताने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये त्रासात अडकलेल्या महिलांचे प्रश्न जवळून समजतात. काही वेळा अत्याचारग्रस्त बाईमागे तिचे कुटुंब, मित्रपरिवार खंबीरपणे उभा दिसतो. मात्र हे सार्वत्रिक चित्र नाही. बरेचदा कोणाचाही पाठिंबा नसताना ती स्त्री एकटीच लढत असते. बऱ्याचदा अर्थनिर्भर बायकाच ही हिंमत दाखवताना दिसतात. मात्र कोणाचा ना कोणाचा आधार घेऊन जगणारी स्त्री अन्यायाविरुद्ध दाद मागताना आजही दहा वेळा विचार करते, हे वास्तव आहे. कोणी तरी आपल्यावर नियंत्रण ठेवत असल्याच्या मानसिक दबावात जगत असल्यामुळे ती परिस्थितीच्या कचाट्यातून बाहेर पडतच नाही. या जबरदस्त पगड्यातून ती आजही निघू शकत नाही. नवरात्रोत्सव साजरा करणाऱ्या समाजाने या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार करायला हवा. केवळ नारेबाजी करून नव्हे, तर स्त्रीला सर्वांगाने सक्षम करण्याचा विडा उचलला तरच या उत्सवाचे साजरीकरण योग्य पद्धतीने होईल, असे आपण म्हणू शकतो.

# अंजीर खाण्याचे हे आहेत जबरदस्त फायदे



मुंबई: अंजीर हे एक आरोग्यदायी सुकामेवा असून, त्यात अनेक पोषक तत्वे असतात. अंजीर खाण्याचे मुख्य फायदे खालीलप्रमाणे आहेत: १. वजन कमी करण्यास मदत अंजीरमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असल्याने ते वजन कमी करण्यासाठी फायदेशीर ठरते. फायबरमुळे पोट बराच काळ भरलेले राहते आणि त्यामुळे वारंवार भूक लागत नाही. यामुळे अनावश्यक खाणे टाळले जाते आणि वजन नियंत्रणात राहते.२. हृदयरोगाचा धोका कमी

अंजीरमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियमचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे रक्तदाब (इश्रेव झीशी-ीींश) नियंत्रित राहतो. तसेच, त्यात असलेले अँटिऑक्सिडंट्स ट्रायग्लिसराइड्सची (ढीळ-सश्रूलशीळवशी) पातळी कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयरोगांचा धोका कमी होतो.

३. हाडांसाठी फायदेशीर

अंजीरमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस हे घटक भरपूर प्रमाणात असल्याने हाडे मजबूत होण्यास मदत होते. जे लोक दुग्धजन्य पदार्थ खाऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी अंजीर एक चांगला पर्याय आहे.

४. पचनसंस्था निरोगी ठेवते

अंजीरमधील फायबर पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेची (उेपीींळरिींळेप) समस्या दूर करण्यास मदत करते. रोज सकाळी भिजवलेले अंजीर खाल्ल्यास पचनसंस्था निरोगी राहते.

५.

# निमित्त; जिमि किमेल वेगळा



विचार मांडणाऱ्यांना 'डावे' किंवा 'देश विरोधी', 'विकास विरोधी' ठरवणे हे अमेरिकेप्रमाणेच भारतातही घडत आहे. अशा व्यक्तींवर कारवाई करणे योग्य असल्याचे दोन्हीकडे ठसवले जात आहे. ते चिंताजनक आहे. जिमि किमेल हे नाव भारतातील अनेकांना माहीतही नसेल. 'अमेरिकन ब्रॉडकास्टिंग कंपनी-एबीसी-या दूरचित्र वाहिनीवर 'लेट नाइट शो' हा कार्यक्रम सादर करणारा हा प्रसिद्ध व लोकप्रिय यजमान, इंग्रजीत 'होस्ट, होता. गेल्या आठवड्याच्या प्रारंभी हा कार्यक्रम बेमुदत स्थगित केल्याचे 'एबीसी'ने जाहीर केले. त्यासाठी अधिकृतरीत्या कारण देण्यात आले नाही; पण जागरूक अमेरिकन नागरिकांना ते लगेच कळले. आपल्या कार्यक्रमात किमेल याने चार्ली कर्क या युवा कार्यकर्त्याच्या हत्येच्या संदर्भात काही विधाने केली ती अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना झोंबली. त्यानंतर 'फेडरल कम्युनिकेशन कमिशन' या सरकारी संस्थेने 'एबीसीला' त्यांचा प्रसारणाचा परवाना रद्द करण्याची 'धमकी'दिली.

त्या नंतर किमेल यांचा कार्यक्रम स्थगित झाला. उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची ही पायमल्ली असल्याची टीका उदारमतवाद्यांनी केली; पण अशा टीकेकडे लक्ष देण्याचा ट्रम्प यांचा स्वभाव नाही. किमेल यांचा कार्यक्रम स्थगित झाल्याचे कळताच अमेरिकेसाठी उत्तम बातमी. किमेलकडे शून्य गुणवत्ता आहे' अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी दिली. त्यांचे मन व मत त्यातून कळले. चार्ली कर्क हा 'टर्निंग पॉइंट यूएसए' या उजव्या विचारसरणीच्या संघटनेचा संस्थापक. श्वेतवर्णीय बहुसंख्याकवादाचा तो कट्टर पुरस्कर्ता होता.


गप्प बसण्याचा इशारा

गेल्या वर्षीच्या निवडणुकीत ट्रम्प यांच्या विजयात त्याचा मोठा हातभार होता. स्थलांतरित, विशेषत: आशियाई व कृष्णवर्णीय स्थलांतरितांच्या विरोधात श्वेतवर्णीयांना भडकावण्याचे कार्य कर्कने केले. त्याचा ट्रम्प यांना फायदा झाला. कर्कची गेल्या१० तारखेला हत्या झाली. त्याच्या द्वेषपूर्ण वक्तव्यामुळे त्याची हत्या झाल्याचे प्राथमिक चौकशीतून दिसले आहे. या संपूर्ण घटनेवर बोलताना किमेल याने हा मारेकरी मूळचा रिपब्लिकन पक्षाशी जवळीक असणारा असावा; पण ट्रम्प व त्यांचे समर्थक त्या व्यक्तीशी आपला संबंध नसल्याचे दाखवण्याची धडपड करत आहेत अशी टिप्पणी केली. ट्रम्प समर्थकांचा उल्लेख त्याने 'मागा गँग' असा केला. 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' 'मागा' ही ट्रम्प यांची घोषणा. 'टोळी' म्हटल्याने त्यांचे समर्थक संतापले. कर्क याची हत्या 'अती डाव्या'विचारातून झाल्याचे ट्रम्प यांनी म्हटले होते. 'फेडरल कम्युनिकेशन कमिशन' ही अमेरिकेतील एकूण प्रसारणावर लक्ष ठेवणारी संस्था. त्या संस्थेने पूर्वी कधी कोण्या दूरचित्रवाहिनीला धमकी दिल्याचे ऐकिवात नाही. ब्रेंडन कार हे त्याचे सध्या अध्यक्ष आहेत. त्यांची नियुक्ती ट्रम्प यांनी केली. ते ट्रम्प यांचे खंदे समर्थक आहेत हे वेगळे सांगायला नको. अमेरिकेस दुसरी मोठी लोकशाही म्हटले जाते. ट्रम्प निवडून आले असले तरी त्यांची वृत्ती हुकूमशाही आहे आणि सध्या ते जे करत आहेत त्याचे 'दंडेलशाही' असे वर्णन जगात केले जात आहे. ट्रम्प यांना त्यांच्यावर किंवा त्यांच्या योजनांवर टीका केलेली खपत नाही. 'वॉल स्ट्रीट जर्नल', 'न्यूयॉर्क टाईम्स' या जगविख्यात दैनिकांविरुद्ध त्यांनी याच वृत्तीतून खटले दाखल केले आहेत. अमेरिकेच्या घटनेच्या पहिल्या दुरुस्तीने तेथील नागरिकांना अभिव्यक्ती व धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. ट्रम्प यांच्या सारखीच मानसिकता भारतातही गेले दशकभर बघायला मिळत आहे. केंद्रावर टीका करणार्या 'मीडिया वन' या केरळमधील दूरचित्र वाहिनीवर दोन वर्षांपूर्वी बंदी घातली गेली होती. ती सर्वोच्च न्यायालयाने उठवली. केंद्रावर टीका करणार्या एखाद्या 'ऑन लाइन'वृत्त वाहिनीला आर्थिक मदत करणार्या संस्थेवर छापे घालण्यात आले. अल्पसंख्याक समाजाच्या पत्रकाराला उत्तर प्रदेश सरकारने तुरुंगात डांबले, ही घटनाही अलीकडचीच. माध्यमे व स्वतंत्र विचारांची गळचेपी करण्याच्या घटना दोन्ही देशांत समांतर पद्धतीने घडत आहेत. दोन्ही देशांत सत्ताधार्यांचे समर्थक परिवार बलशाली झाले आहेत. पॅलेस्टिनी नागरिकांचे हत्याकांड करणार्या इस्रायल विरुद्ध बोलल्यास त्यांना मुस्लिम धार्जिणे ठरवण्याची प्रवृत्ती दोन्हीकडे दिसते. सत्ता व नेतृत्व यांच्यावर केलेली टीका सहन केली जाणार नाही हा महत्त्वाचा मुद्दा. जिमि किमेल हे केवळ निमित्त!

## डॉक्टर टिप्स



### तुम्ही डेमिसेक्शुअल (demisexual) तर नाही, जाणून घ्या याचे लक्षण



मागील काही वर्षांमध्ये सेक्शुएलिटीबद्दल लोक जास्त खुलून बोलू लागले आहे. आता या मुद्द्यांवर प्रत्येक व्यक्ती आपले विचार आणि आवड निवड व्यक्त करू लागला आहे. अलैंगिक, हा एक असा शब्द आहे ज्याबद्दल आतापर्यंत तुम्ही फारच कमी किंवा कदाचित ऐकले ही नसेल. यात ते लोक येतात ज्यांना सेक्सची इच्छा नसते किंवा जे रिलेशनशिपबगैर संबंध बनवण्यास तयार होऊन जातात आणि ते लोक मुलगी असो की मुलगा दोघांशी संबंध बनवण्यास तयार होऊन जातात.

**डेमिसेक्शुअल आणि अलैंगिकमध्ये काय फरक आहे?**

अलैंगिक लोकांना सहवास बिलकुल आवडत नाही आणि यांच्यात सहवास करण्याची इच्छाही जागृत होत नाही. तसेच दुसरीकडे डेमिसेक्शुअल व्यक्ती सहवासाठी फक्त त्याच लोकांप्रती उत्तेजित होतो ज्याच्याशी ते प्रेम करतात.

## विनोद




शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात, मला सांग, आई श्रेष्ठ की शिक्षक?
शिक्षक !
कारण आई एका वेळेस एकाच मुलाला झोपवते तर शिक्षक नीरस शिकवताना सर्व वर्गाला झोपवतात.

## संदेश

Fiza mein mehakti saam
ho tum,
Pyaar mein jhalakta jaam
ho tum
Aur kaya kahe janam tere
bare me
Kharche ka dusra naam
ho tum.

## सुविचार



नियतीवर...परमेश्वरावर कोणावर तरी विश्वास ठेवा!


**संस्कृत सुभाषित**

**धनेषु जीवितव्येषु स्त्रीषु भोजनकृत्तिषु।**
**अतृप्ता मानवा: सर्वे याता यास्यान्ति यान्तिंच ॥**

**अर्थ :** संपत्ती, जीवन, स्त्री आणि भोजन (यथास्थित) उपभोगून या सर्व बाबतीत मानव (माणसे) अतृप्तच राहून गेले (मेले) जातील आणि जातात (मरतील आणि मरतात).

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. ९



## आडवे शब्द

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

## उभे शब्द

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्री
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

## आडवे उत्तरे

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

## उभे उत्तरे

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकिस्तानच्या ड्रेसिंग रूममध्ये गेला, आतली बातमी काढली, गौतम गंभीरचा हुकमी एक्का कामी आला!

दुबई-आशिया कपच्या सुपर-४ सामन्यात टीम इंडियाचा पाकिस्तानविरुद्ध ६ विकेटने दणदणीत विजय झाला. १७२ रनच्या आव्हानाचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल या भारताच्या दोन्ही ओपनरनी पाकिस्तानच्या बॉलिंगवर आक्रमण केलं. अभिषेक शर्माने ३९ बॉलमध्ये ७४ आणि गिलने २८ बॉलमध्ये ४७ रनची खेळी केली. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल भारताच्या विजयाचे हिरो ठरले असले, तरी या सामन्यात टीम इंडियाकडून बऱ्याच चुका झाल्या.

पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात टीम इंडियाने ४ कॅच सोडले, तसंच बॉलिंगमध्येही भारतीय बॉलरचा खराब दिवस होता. टीम इंडियाचं ट्रम्प कार्ड असलेल्या जसप्रीत बुमराहने ४ ओव्हरमध्ये ४५ रन दिले, तसंच त्याला एकही विकेट मिळाली नाही. तर वरुण चक्रवर्तीलाही एकही विकेट घेण्यात यश आलं नाही. १२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांनंतर पहिल्यांदाच वरुण चक्रवर्तीला विकेट घेता आली नाही.

भारताने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानने पहिल्या १० ओव्हरमध्ये ९१ रन करून १ विकेट गमावली होती, पण ड्रिंक्स ब्रेकनंतर शिवम दुबेने पाकिस्तानला दोन धक्के दिले. शिवम दुबेने ड्रिंक्स ब्रेकनंतर ११ बॉलमध्ये २ विकेट घेतल्या. शिवम दुबेच्या या स्पेलमुळे भारताने पाकिस्तानला १७१ रनवर रोखलं. शिवम दुबेने ४ ओव्हरमध्ये ३३ रन देऊन २ विकेट घेतल्या. शिवम दुबेचा स्पेल मॅचचा टर्निंग पॉईंट ठरल्याचंही कॅप्टन सूर्यकुमार यादव म्हणाला.

### 'गन सेलिब्रेशन'नंतर फरहानचा आणखी एक उर्मटपणा, म्हणाला-तुम्हाला काय वाटते याची...

दुबइ-आशिया कप २०२५ मधील भारताविरुद्धच्या सुपर-४ सामन्यात पाकिस्तानचा सलामी फलंदाज साहिबजादा फरहान याने अर्धशतकी खेळी साकारली होती. फरहानने ५ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ४५ चेंडूत ५८ धावा केल्या. २१ सप्टेंबर (रविवार) रोजी दुबई इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात साहिबजादा फरहान खेळातील कामगिरीबरोबरच त्याच्या 'गन सेलिब्रेशन'मुळेही चर्चेत राहिला.

प्रत्यक्षात अर्धशतक पूर्ण केल्यानंतर फरहानने आपला बॅट बंदुकीसारखा पकडून सेलिब्रेशन केले. यावरून चाहत्यांनी त्याची टीका केली. आता फरहानने या 'गन सेलिब्रेशन'वर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. फरहान म्हणाला की, त्याने जे सेलिब्रेशन केले ते त्या क्षणाचा केवळ एक भाग होता. लोक काय म्हणतील याची त्याला काहीही पर्वा नाही.

पाकिस्तानची पुढची लढत श्रीलंकेविरुद्ध होणार आहे आणि सामन्यापूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत साहिबजादा फरहान म्हणाला, जर तुम्ही षटकारांविषयी बोलत असाल, तर पुढेही असे बरेच पाहायला मिळेल. मी जे 'गन सेलिब्रेशन' केले, ते फक्त त्या क्षणाचे एक मोमेंट होते. मी साधारणपणे पन्नास धावा केल्यानंतर जास्त सेलिब्रेशन करत नाही. पण अचानक माझ्या डोक्यात आले की आज काही वेगळं करूया, म्हणून मी ते केलं.

फरहान पुढे म्हणाला, मला माहिती नाही लोक हे कसे घेतील. खरं सांगायचं तर मला त्याची काहीही काळजी नाही.

***

### अभिषेक शर्मा अन् शुभमन गिलने विजयाचा पाया रचला

दुबइ-भारत आणि पाकिस्तान आशिया चषकात २०२५ मध्ये सुपर -४ मध्ये रविवारी आमने सामने आले होते. या सामन्यात भारतानं पाकिस्तानला ६ विकेटनं पराभूत केले. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव यानं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. पाकिस्तानच्या संघानं ५ बाद १७१ धावा केल्या. तर, भारतानं १९ व्या ओव्हरमध्येच ६ विकेटनं विजय मिळवला. शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा या दोघांनी दमदार फलंदाजी करत पहिल्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी करत भारताच्या विजयाचा पाया रचला. अभिषेक शर्मानं ३९ बॉलमध्ये ७४ धावा ६ चौकार आणि ५ षटकारांसह केल्या. तर, शुभमन गिल यानं २८ बॉलमध्ये ८ चौकारांच्या जोरावर ४७ धावा केल्या. भारताच्या विजयाचा पाया रचणाऱ्या अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल या दोघांना इम्पॅक्ट प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार मिळाला नाही. भारतीय ड्रेसिंग रुममध्ये हा पुरस्कार भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब करणाऱ्या तिलक वर्मांना देण्यात आला. बीसीसीआयनं हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

इम्पॅक्ट प्लेअर ऑफ द मॅचचा विजेता कोण?

तिलक वर्मान पाकिस्तान विरुद्ध संयमी आणि तितकीच आक्रमक फलंदाजी केली. कॅप्टन सूर्यकुमार यादव खातं न उघडता बाद झाल्यानंतर तिलक वर्माच्या खेळीमुळं भारत विजयापर्यंत पोहचला. तिलक वर्माला अगोदर संजू सॅमसन आणि नंतर हार्दिक पांड्यानं साथ दिली. तिलक वर्मानं १९ बॉलमध्ये दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीनं नाबाद ३० धावांची खेळी केली.

## हे कसले द्वंद्वः! भारत-पाकिस्तान मध्ये आता स्पर्धाच नाही; सूर्यकुमार





**दुबई:**भारतीय संघाने सध्या संयुक्त अरब अमिराती येथे सुरू असलेल्या आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीपाठोपाठ 'अव्वल चार' संघांच्या फेरीतही पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले.

दुबई : दोन संघ एकमेकांना कडवी झुंज देतात, एकमेकांशी स्पर्धा करतात, समसमान सामने जिंकतात, तेव्हा त्याला द्वंद्व म्हणणे योग्य ठरते, मात्र दोन संघ समोरासमोर आल्यावर त्यापैकी एकच संघ दरवेळी विजयी होत असेल, तर त्याला द्वंद्व कशाला म्हणायचे? अशा शब्दांत भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तान संघाला टोला लगावला.

भारतीय संघाने सध्या संयुक्त अरब अमिराती येथे सुरू असलेल्या आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीपाठोपाठ 'अव्वल चार' संघांच्या फेरीतही पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले. पाकिस्तानने दिलेले १७२ धावांचे लक्ष्य भारताने सहा गडी आणि सात चेंडू राखून गाठताना अंतिम फेरीच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले. ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानविरुद्ध भारताचा हा सलग आठवा विजय ठरला. तसेच उभय संघांत आजपर्यंत एकूण १५ ट्वेन्टी-२० सामने झाले असून यात १२ वेळा भारताने बाजी मारली आहे. याकडे लक्ष वेधत आता दोन संघांमध्ये कोणतीही स्पर्धाच उरलेली नसल्याची टिप्पणी सूर्यकुमारने केली.अव्वल चार' फेरीतील सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पाकिस्तानच्या एका वरिष्ठ पत्रकाराने दोन संघांतील गुणवत्ता आणि क्षमता यात किती मोठी तफावत आहे, असा प्रश्न सूर्यकुमारला विचारला. यावर हसून उत्तर देताना सूर्यकुमार म्हणाला, ''सर, आता आपण भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्वंद्व (रायवलरी) आहे असे म्हणणे आधी बंद केले पाहिजे. दोन संघ एकमेकांविरुद्ध १५ सामने खेळले असतील, त्यापैकी एका संघाने आठ आणि दुसऱ्या संघाने सात सामने जिंकले असतील, तर आपण या दोन संघांत द्वंद्व आहे किंवा स्पर्धा आहे, असे म्हणू शकतो. मात्र, इथे एक संघ १२ सामने जिंकला आहे, तर दुसऱ्या संघाला तीनच विजय मिळवता आले आहेत. मग याला द्वंद्व कसे म्हणायचे?''भारताच्या विजयात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या अभिषेक शर्मा (३९ चेंडूंत ७४ धावा) आणि शुभमन गिल (२८ चेंडूंत ४७) या सलामीवीरांच्या कामगिरीचेही सूर्यकुमारने कौतुक केले. ''अभिषेक आक्रमक आहे, तर गिल शांत आणि संयमी आहे. त्यामुळे हे दोघे एकमेकांना पूरक ठरतात. एक जण मोठे फटके मारत असेल, तर दुसऱ्याने एक-दोन धावांवर भर देत खेळपट्टीवर टिकणे गरजेचे असते. ही गोष्ट हे दोघे चांगल्या पद्धतीने जाणतात. त्यांच्यातील ताळमेळही उत्तम आहे. त्यांनी रचलेल्या शतकी भागीदारीमुळेच आम्हाला विजय मिळवणे सोपे झाले,'' असे सूर्यकुमारने नमूद केले.

पाकिस्तानी खेळाडूंनी डिवचले -अभिषेक

आशिया चषकाच्या 'अव्वल चार' फेरीत अभिषेक शर्माने फटकेबाज खेळी केली. या खेळीदरम्यान त्याची शाहीन आफ्रिदी आणि हारिस रौफ या पाकिस्तानी गोलंदाजांशी शाब्दिक चकमक झाली. पाकिस्तानच्या खेळाडूंनी आम्हाला (अभिषेक आणि गिलला) डिवचले, त्यामुळे त्यांना प्रत्युत्तर देणे गरजेचेच होते, असे स्पष्टीकरण अभिषेकने सामन्यानंतर दिले.

- ''पाकिस्तानचे खेळाडू विनाकारणच आमच्या अंगावर धावून येत होते आणि आम्हाला काहीतरी बोलत होते. मला हे अजिबातच आवडले नाही. त्यांना उत्तर देणे गरजेचे होते. त्यामुळेच मी आक्रमक शैलीत फलंदाजी करत त्यांचा समाचार घेतला,'' असे अभिषेकने सांगितले.

- अभिषेकने गिलसह १०५ धावांची सलामी दिली. यंदाच्या आशिया चषकातील ही सर्वोच्च भागीदारी ठरली. अभिषेक आणि गिल हे दोघे पंजाबचेच असून लहानपणीपासूनचे मित्र आहेत. गिलबरोबर फलंदाजी करताना नेहमीच मजा येते, असे अभिषेक म्हणाला. - ''आम्ही शालेय स्तरापासून एकत्र खेळत आहोत. आमच्यात चांगली मैत्री आहे आणि हेच मैदानावरही दिसते. आम्ही या स्पर्धेत मोठी भागीदारी रचू असे वाटले होते. अखेर आम्ही हे यश पाकिस्तानविरुद्ध मिळवले. स्वत:च्या कामगिरीबाबतही मी समाधानी आहे. मी मोठ्या फटक्यांचा खूप सराव करतो. त्यामुळेच मला सामन्यात यश मिळवता येते. लयीत असल्यास मी संघाला सामने जिंकवून देऊ

## तुम्ही उसेन बोल्टचे चाहते असाल तर तुमच्यासाठी आहे ही गुडन्यूज...




**मुंबई :** फास्टेस्ट मॅन ऑन अर्थ अशी ओळख असणारा जमैकाचा दिग्गज धावपटू उसेन बोल्ट १ ऑक्टोबर रोजी प्रदर्शनीय फुटबॉल सामना खेळण्यासाठी भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. महान खेळाडूंपैकी एक आणि आठ ऑलिंपिक सुवर्णपदके जिंकणारा बोल्ट, दिग्गज फुटबॉलपटू, बॉलिवूड सेलिब्रिटी आणि इतर प्रमुख व्यक्तींसोबत हा फुटबॉल सामना खेळणार आहे.

उसेन बोल्ट बंगळुरू एफसी आणि मुंबई सिटी एफसी या दोन्ही संघांकून एकेक हाफमध्ये खेळणार आहे. ३० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या पुमाच्या दोन दिवसीय उत्सवाचा भाग म्हणून तो भारतात येत आहे. हा सामना पाहण्यासाठी बोल्टच्या चाहत्यांना या सामन्यासाठी तिकिटे खरेदी करावी लागणार आहेत. पुमा इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक कार्तिक बालगोपालन म्हणाले, आम्हाला विश्वास आहे की, खेळांमध्ये समुदायांना प्रेरणा देण्याची आणि एकत्र आणण्याची शक्ती आहे. फुटबॉल हा भारतीय तरुणांमध्ये सर्वात लोकप्रिय खेळांपैकी एक आहे. आणि आम्ही उसेन बोल्टला येथे फुटबॉल खेळण्यासाठी आमंत्रित करून हे साजरे करू इच्छित आहोत.

बोल्ट नेहमीच फुटबॉलबद्दल उत्साही राहिला आहे. अगदी ट्रॅकच्या बाहेरही. लहानपणी तो अनेकदा फुटबॉल खेळत असे आणि मैदानावर त्याचा वेग आणि कौशल्य दाखवण्याचे स्वप्न पाहत असे. ॲथलेटिक्समधून निवृत्त झाल्यानंतरही त्याने हा खेळ गांभीर्याने घेतला,प्रशिक्षण घेतले आणि प्रदर्शनीय सामने खेळले आणि गोलही केले आहेत. त्यामुळे आता भारतीय क्रीडा प्रेमींना फुटबॉलच्या मैदानावर उसेन बोल्टचा खेळ पाहण्याची नामी संधी मिळणार आहे.

## पाकिस्तानला लोळवल्यावर शुभमनच्या सोशल मीडिया पोस्टने वेधले लक्ष

दिल्ली-भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात आशिया कप २०२५ चा सुपर ४ सामना रविवार २१ सप्टेंबर रोजी खेळवला गेला. या सामन्यात टॉस जिंकून भारताने पाकिस्तानला फलंदाजीचं आव्हान दिलं होतं. यावेळी पाकिस्तानने ५ विकेट गमावून २० ओव्हरमध्ये १७१ धावा केल्या. त्यामुळे टीम इंडियाला विजयासाठी १७२ धावांचं आव्हान मिळालं होतं. टीम इंडियाने हे आव्हान ६ विकेट राखून पूर्ण केलं. या सामन्यात पाकिस्तानच्या खेळाडूंनी मैदानात भारतीय खेळाडूंना डिवचण्याचा प्रयत्न केला. तेव्हा भारताच्या युवा फलंदाजांनी सुद्धा त्यांना चोख उत्तर दिलं. सलामी फलंदाज शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा यांनी १०५ धावांची पार्टनरशिप केली. पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव झाल्यावर शुभमन गिलने एक्सवर एक पोस्ट शेअर केली ज्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

शुभमन गिल काय म्हणाला?

सामना सुरु असताना पाकिस्तानी खेळाडूंनी भारतीय खेळाडूंना उकसवण्याचा खूप प्रयत्न केला. मात्र भारतीय फलंदाज मैदानात टिकून राहिले आणि त्यांनी विजयाचं आव्हान ६ विकेट राखून पूर्ण केलं. या विजयानंतर उपकर्णधार शुभमन गिलने एक्स अकाउंटवर पोस्ट केली. ज्यात त्याने म्हटले की, 'खेळ बोलतात, शब्द नाहीत'. यासह त्याने सामन्याचे काही फोटो शेअर केले. पाकिस्तानी खेळाडूने गिल आणि अभिषेकशी घातला वाद :

भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याच्या दुसऱ्या इनिंगमध्ये पाचवी ओव्हर सुरु असताना हा प्रकार घडला. पाचव्या ओव्हरला हरिस रौफ हा रागात अभिषेक शर्माच्या जवळ पोहोचला. अभिषेकने हरिस रौफविरुद्ध उत्तम फलंदाजी करत होता आणि हेच त्याला आवडले नाही. हरिसला राग अनावर झाला आणि तो अभिषेकशी भांडायला गेला. दोघे एकमेकांसमोर येऊन उभे ठाकल्याने मैदानावरच वातावरण तणावाचे बनले होते. तेवढ्यात अंपायरमध्ये पडले आणि त्यांनी वाद शांत करून दोघांना एकमेकांपासून बाजूला केले. भारताने ६ ओव्हरमध्ये कोणताही विकेट न गमावता ६१ धावा केल्या. टीम इंडियाची जबरदस्त फटकेबाजी :

विजयाचे आव्हान पूर्ण करताना टीम इंडियाचे सलामी फलंदाज अभिषेक शर्मा आणि शुभमन गिलने मैदानात तुफान फटकेबाजी केली. दोघांनी १०५ धावांची पार्टनरशिप केली.



## अक्षर पटेल दुखापतीमुळे पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यातून बाहेर





दुबई : यूएईमध्ये सुरू असलेल्या आशिया कपमध्ये शुक्रवारी भारत आणि ओमान यांच्यात गट टप्प्यातील शेवटचा सामना खेळला गेला. या सामन्यात टीम इंडियाने २१ धावांनी विजय मिळवला. ओमानने शेवटपर्यंत झुंज दिली आणि चाहत्यांची मनं जिंकली. या विजयासह भारत गट-अ मध्ये अपराजित ठरला. भारताने तीनही सामने जिंकून एकूण ६ गुणांची कमाई केली. आता भारत थेट पाकिस्तानशी भिडणार आहे.

हा सामना रविवारी दुबई क्रिकेट ग्राउंडवर खेळला जाणार आहे. गट टप्प्यात भारताने पाकिस्तानवर ७ गडी राखून विजय मिळवला होता. त्यामुळे सूर्यकुमार यादव अँड कंपनी पुन्हा एकदा पाकिस्तानला हरवण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. मात्र या महत्त्वाच्या लढतीपूर्वी भारताला धक्का बसला आहे, कारण अक्षर पटेल जखमी झाला आहेत.माहितीनुसार, अक्षर पटेल रविवारी पाकिस्तानविरुद्धच्या सुपर फोर सामन्यात खेळू शकतील की नाही, याबाबत शंका आहे. ओमानविरुद्ध अबुधाबीत खेळल्या गेलेल्या सामन्यात फील्डिंगदरम्यान त्यांना डोक्याला दुखापत झाली. ओमानच्या डावातील १५व्या षटकात हम्माद मिर्झाचा एक कॅच झेलण्यासाठी अक्षर मिड-ऑफवरून धावत आला. पण शेवटच्या क्षणी चेंडू हातातून सुटला. पुन्हा प्रयत्न करताना तो खाली पडला आणि त्यांच्या डोक्याला जोराची धडक बसली. यानंतर फिजिओच्या मदतीने अक्षरला मैदानाबाहेर नेण्यात आलं. त्या वेळी ते मान व डोक्याचा भाग धरून होते. उरलेल्या सामन्यात तो मैदानावर परतला नाहीत.सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत फील्डिंग कोच टी दिलीप यांनी सांगितलं की अक्षर ठीक आहेत. पण सामन्यांमधील अल्पावधीत होणारा बदल हा संघासाठी आव्हानात्मक ठरू शकतो. कारण पाकिस्तानविरुद्धच्या महत्त्वाच्या लढतीसाठी भारताकडे तयारीसाठी ४८ तासांपेक्षाही कमी वेळ आहे. जर अक्षर पटेल मैदानात उतरले नाहीत, तर टीम मॅनेजमेंटसमोर तीन फिरकीपटूंना खेळवण्याचं मोठं आव्हान उभं राहील. सध्या भारताकडे वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव हे दोन प्रमुख फिरकीपटू आहेत. तिसर्या फिरकीसाठी संघ व्यवस्थापनाला रियान पराग किंवा वॉशिंग्टन सुंदर या राखीव खेळाडूंपैकी

## पाकिस्तानचा संघ आशिया चषकातून होऊ शकतो बाहेर




मुंबई-आशिया चषक २०२५ मधील सुपर फोर टप्प्याला सुरूवात झाली. भारतीय संघाने पाकिस्तानला पराभूत करत विजयासह या मोहिमेला सुरूवात केली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने सुपर फोरमधील सामन्यातही पाकिस्तानचा ६ विकेट्सने सहज पराभव केला. अभिषेक शर्मा भारताच्या विजयाचा नायक ठरला. पण या पराभवानंतर पाकिस्तानचा संघ आशिया चषक स्पर्धेतून बाहेर पडू शकतो.भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका हे संघ सुपर फोरसाठी पात्र ठरले आहेत. सुपर फोरमध्ये प्रत्येक संघ ३-३ सामने खेळणार आहे आणि सुपर फोरच्या गुणतालिकेत टॉप-२ संघ थेट अंतिम फेरीसाठी पात्र होतील. भारताचा पुढील सुपर फोर सामना २४ सप्टेंबरला बांगलादेशविरुद्ध होईल. या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवल्यास संघाचं अंतिम फेरीतील स्थान निश्चित होईल, तर दोन दिवसांनी त्यांचा सामना श्रीलंकेविरूद्ध होईल. तर दुसरीकडे, भारताकडून झालेल्या दारुण पराभवानंतर पाकिस्तानच्या अंतिम फेरीच्या संधी आणखी कमी झाल्या आहेत.

अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी पाकिस्तानला आता केवळ बांगलादेश आणि श्रीलंकेविरुद्धच विजय मिळवावा लागणार नाही, तर मोठ्या फरकाने विजय मिळवत गुणतालिकेत चांगला नेट रन रेट असणे महत्त्वाचे आहे.

पाकिस्तानचे सुपर फोरमधील उर्वरित दोन सामने करो या मरो २३ सप्टेंबरला पाकिस्तानचा सामना श्रीलंकेशी होईल. दोन्ही संघांनी त्यांचे सुपर फोरमधील पहिले सामने गमावले. त्यामुळे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दोन्ही संघांसाठी विजय आवश्यक असेल. पण पाकिस्तान किंवा श्रीलंका यांच्यातील एका संघाच्या पराभवामुळे त्यांचे आशिया चषकातील अभियान जवळजवळ संपुष्टात येईल.

सुपर फोर गुणतालिकेत भारत अव्वल स्थानावर आहे. भारत आणि बांगलादेश दोघांनीही त्यांचे सुरुवातीचे सामने जिंकले आहेत. नेट रन रेट फरकामुळे भारत पहिल्या स्थानी तर बांगलादेश दुसऱ्या स्थानावर आहे, तर श्रीलंका आणि पाकिस्तान अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहेत.

जर सलमान आघाचा संघ श्रीलंकेविरुद्ध पराभूत झाला तर त्यांचा प्रवास जवळजवळ संपेल, कारण त्यानंतर अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी पाकिस्तानला बांगलादेशविरुद्धचा पुढचा सामना जिंकावा लागेल. . बांगलादेश आणि श्रीलंका प्रत्येकी एक सामना गमावतील, अशी प्रार्थना पाकिस्तानला करावी लागेल. पाकिस्तानने आपला नेट रन रेट सुधारण्यावरही लक्ष देणं गरजेचं असणार आहे. अन्यथा, रन रेटमुळे ते स्पर्धेतून बाहेर पडू शकतात.



# काटेजवळग्याच्या ओढ्याच्या पूरात दोघे वाहून गेले,एक बचावला,तर दुसऱ्याचा मृतदेह सापडला

## निलंगा तालुक्यात पावसाचा पून्हा कहर

**निलंगा/आयुब बागवान:** शेताकडे गाय घेऊन जाताना काटेजवळगा तालुका निलंगा येथील ओढ्याला आलेल्या पूराच्या पाण्यात दोघे वाहून गेल्याची घटना रविवारी ता. २१ रोजी सकाळी सहाच्या सुमारास घडली यामध्ये एकजण बचावला तर एक जन बेपत्ता होता. बेपत्ता शेतकऱ्यांना शोधण्यासाठी पथकाला पाचारण करण्यात आले होते. निलंगा तालुक्यात पावसाने झोडपले असून पावसाचा कहर झाला आहे.

याबाबतची माहिती अशी की रात्री तालुक्यातील विविध भागात जोरदार पाऊस झाला या पावसामुळे मोठ्या प्रमाणात ओढ्यांना पूर आला असून शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक गावातील घरामध्ये पाणी शिरले आहे तालुक्यातील पानचिंचोली,

लाबोंटा, काटेजवळगा यासह अनेक गावातील घरामध्ये पाणी शिरले आहे तर काही ठिकाणी घराची पडझड झाली आहे. काटेजवळगा तालुका निलंगा येथील वैजनाथ श्रीपती राजमाने वय ५० व दयानंद संभाजी बोयणे ४५ हे दोघे शेताकडे सकाळी गाय घेऊन जात असताना रेड्डी यांच्या शेताजवळील वड्याला मोठा पूर आला होता. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे हे दोघे रस्ता पूर्ण करत असताना दोघेही पुराच्या पाण्यात वाहून गेले यामध्ये दयानंद बोयणे हे बालबाल बचावले तर वैजनाथ राजमाने हे सकाळपासून बेपत्ता होते अखेर त्याचं मृतदेह सापडला..गावातील मुक्कामी असणारी बस गाडी बंद होती त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात नागरिक या वड्याच्या ठिकाणी जमा झाले होते परंतु त्यांच पत्ता लागत नव्हता दोघांपैकी एकाचे प्राण वाचले असून वैजनाथ श्रीपती राजमाने यांना शोधा शोध करून अखेर मृतदेह सापडलं आहे याबाबत एनडीआरएफच्या पथकाला पाचारण करण्यात आले होते त्यामुळे हे पथक बेपत्ता व्यक्तीचा शोध घेतला आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये रात्री मोठ्या प्रमाणात पाऊस झाला असून यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे अनेक क्षेत्रांमध्ये पाणी साचून खरिप हंगामातील सोयाबीन, तूर, उडीद या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तर अनेक शेतकऱ्यांचा ऊस आडवा पडला आहे त्यामुळे या मुसळधार पावसामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तालुक्यात झालेला पाऊस

निलंगा - ३६ मी. मी. , पानचिंचोली-३, निटूर ५५, औरादशहाजानी ५०, कासारबालकुंदा



५२, अंबुलगा २७, कासारशिरसी ३८, मदनसुरी ४४, हलगरा १४, भुतमुगळी ३८ या दहा महसूल मंडळात झालेली पावसांची नोंद

## लातूर जिल्हा माहिती कार्यालयतील रद्दी खरेदीसाठी ३० सप्टेंबरपर्यंत दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा माहिती कार्यालय, येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे. यासाठी नोंदणीकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपले दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्यावर ३० सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत. कार्यालयीन वेळेत रद्दी पाहावयास मिळेल.

रद्दी खरेदीदाराकडे इलेक्टॉनिक वजन काटा असणे बंधनकारक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील. दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा याचे स्वतंत्र दर नमूद करावेत. रद्दी विक्रीचे दरपत्र मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपूर्ण रद्दी विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांना राहतील, असे लातूर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## दयानंद कॉमर्स कॉलेजमध्ये इंजिनियर्स डे साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बी.कॉम. कॉम्प्युटर एप्लीकेशनच्या विद्यार्थ्यांसाठी इंजिनियर्स डे साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रोफेसर डॉक्टर प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणले, अपयशाला खचून न जाता सातत्याने प्रयत्न करा. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रतीक मुसमाडे यांनी विद्यार्थ्यांना असे मार्गदर्शन केले की नवीन नवीन टेक्नॉलॉजी सतत आत्मसात करत चला तरच तुम्ही या स्पर्धे च्या युगात टिकाल. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूसी समन्वयक डॉ.बी.टी. चव्हाण व बीकॉम कॉम्प्युटर एप्लीकेशन कोर्स कॉर्डिनेटर एम.व्ही.पटणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी प्राध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## रोटरी भूषण पुरस्कार कायम स्मरणात राहणारा - सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील



**अहमदपूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लबच्या वतीने दिला गेलेला रोटरी भूषण पुरस्कार हा मला कायम स्मरणात राहणारा असल्याचे प्रतीपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदियाचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे किलबिल इंटरनॅशनल स्कूल येथे रोटरी क्लब अहमदपूर यांच्या वतीने राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांना रोटरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी सत्काराला उत्तर देताना सहकार मंत्री ना. पाटील बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे अध्यक्ष कपिल बिराजदार होते. व्यासपीठावर रोटरी क्लबचे सचिव प्रदीप ढेले, उपप्रांतपाल चंद्रशेखर मुळे, इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ज्ञानोबा भोसले, प्रदेशाची चिटणीस राष्ट्रवादी कॉंग्रेस शिवानंद हेंगणे, महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्ती कांबळे यांच्या सह विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, रोटरी क्लब चे माझे जुने नाते असून रोटरी क्लब हे समाजातील चांगल्या गोष्टी स्वीकारतात. रोटरी क्लबचे काम अत्यंत मोठे असून, रोटरी क्लबचा हा दिला जाणारा मला पुरस्कार हा आपल्या माणसांचा पुरस्कार आहे त्यामुळे मला तो अधिक हृदयस्पर्शी वाटतो असे सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले. यावेळी अहमदपूर तालुक्यातील जवळपास २२ जणांना राष्ट्र शिल्पकार पुरस्काराने सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष कपिल बिराजदार यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक अनिल चवळे यांनी केले.

## एक पेड़ माँ के नाम - स्वच्छता ही सेवा २०२५ अंतर्गत सोलापूर विभागाची सोलापूर आणि कलबुरगि येथे वृक्षारोपण मोहीम






**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २१ सप्टेंबर २०२५ रोजी एक पेड़ माँ के नाम उपक्रमांतर्गत स्वच्छता ही सेवा २०२५ मोहिमेचा भाग म्हणून वृक्षारोपण मोहीम आयोजित केली. मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनेच्या (CRWWO), सोलापूर विभागाच्या महिला कर्मचारी आणि सदस्यांनी या मोहिमेत उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमात, सुमारे ४० महिला सहभागींनी बाल विकास मंदिर शाळा, सोलापूर; रेल्वे रुग्णालय, सोलापूर; आणि कलबुरगि रेल्वे स्टेशन या तीन ठिकाणी एरिका पाम, बॉटल पाम, मोरपंख, चमेली आणि गुलाब यासह ९० रोपे लावली. एक पेड़ माँ के नाम ही संकल्पना भविष्यात झाडांची काळजी घेण्याच्या जबाबदारीशी आईंबद्दलच्या आदराच्या भावनेला जोडण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली.

या कार्यक्रमात CRWWO च्या अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती आणि सक्रिय सहभाग दिसून आला - श्रीमती निभा कुमारी, अध्यक्षा; श्रीमती पल्लवी गणेर, सचिव; श्रीमती सपना बनसोडे, कोषाध्यक्ष; श्रीमती सुमन साहू; श्रीमती सरोज भोसले आणि इतर. CRWWO सदस्य आणि महिला कर्मचाऱ्यांनी या उदात्त कार्यात हातभार लावला, जो पर्यावरण संरक्षणात महिलांच्या शक्तिशाली भूमिकेचे प्रतीक आहे.

वृक्षारोपण उपक्रमाचे सुरळीत आयोजन आणि समन्वय सोलापूर विभागाचे सहाय्यक विभागीय अभियंता (ट्रॅक) श्री. विजयकुमार खामगावकर, श्री. जितेंद्र वाघमारे आणि श्री. कपिल इंगोले यांच्या टीमच्या सहकार्याने करण्यात आला.

हा उपक्रम केवळ पर्यावरण संरक्षणात योगदान देत नाही तर कुटुंब आणि निसर्ग दोघांसाठीही जबाबदारी, काळजी आणि समर्पणाचा संदेश देखील देतो. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग शाश्वत विकास, लोकसहभाग आणि स्वच्छतेची भावना ही सेवा यासाठी वचनबद्ध आहे.

## अमित गायकवाड बेंगळुरू येथील केंद्रीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशास पात्र



**लातूर/प्रतिनिधी :** येथील प्रकाश नगर येथील रहिवासी अमित मिलींद गायकवाड या विद्यार्थ्यांने नीट - २०२५ परिक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश प्राप्त केले आहे. या परिक्षेत त्याला ४०७ गुण प्राप्त करून ऑल इंडिया रँक मध्ये १२१०९ वा क्रमांक मिळवला आहे.

कोरोना काळात वडिलांचे छत्र हरवल्याने आता चांगले शिक्षण घेतल्याशिवाय पर्याय नाही व ज्या आजाराने वडीलांचा मृत्यू झाला त्या प्रकारच्या आजारांवर मात करण्यासाठी त्याने डॉक्टर होण्याची जिद्द मनात बाळगली. अभ्यासाचे नियोजन करून त्यानी हे यश प्राप्त करून देशातील नामांकित बेंगळुरू येथील केंद्रीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला आहे.

त्याच्या या यशा बद्दल प्रा गोविंदराव घार,प्राचार्य प्रशांत घार ,प्राचार्य श्रीधर कोल्हे,श्रीमती संगीता मोळवणे, प्रा.दिलीप गुंजरगे,डॉ आर जी स्वामी, सतिश वाकडे, सचिन शिखरे,राजू सी पाटील, विजय कनगुले,राहुल शिखरे, मुरलीधर पोटभरे,रंगनाथ चव्हाण, प्रशांत जोशी आदींनी अमित गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे.

## दयानंद शिक्षण संस्थेतंर्गत असलेल्या विविध महाविद्यालयाच्या वार्षिकांकाचे प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्थेतंर्गत असलेल्या दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या उन्मेष, दयानंद कला महाविद्यालयाच्या वेध, दयानंद विधी महाविद्यालयाच्या ज्युडिशियम डेई,दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या अंतरंग आणि दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या आनंदतरंग या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील वार्षिकांकाचे प्रकाशन दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.याप्रसंगी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी,सदस्य सागर मंत्री,दयानंद शिक्षण संस्था शैक्षणिक विकास अधिकारी



प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पुनम नाथानी, दयानंद फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रिती पटवारी, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरूडकर,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी आणि प्रमुख मान्यवरांनी सर्वच महाविद्यालयाच्या वार्षिकांकाचे कौतुक केले आणि सर्वांना शुभेच्छाही दिल्या.तसेच प्रत्येक महाविद्यालयांचा वार्षिकांक हा त्या- त्या महाविद्यालयाचा आरसाच असून या वार्षिक अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशील लेखननिर्मितीला निश्चितच वाव मिळालेला आहे.विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभव व प्रतिभाशक्तीच्या जोरावर दर्जेदार कथा, कविता, वैचारिक लेख, सुविचार,चारोळ्याचे लेखन केलेले आहे.यातूनच विद्यार्थ्यांच्या सुप्त लेखन कौशल्याला वाव मिळण्याबरोबरच महाविद्यालयांनी वर्षभरात साहित्य,संगीत,कला,क्रीडा,विज्ञान,बारावी बोर्ड परीक्षा,नीट,जेईई,सीईटी परीक्षा आणि सामाजिक इ.अनेक क्षेत्रात केलेल्या नेत्रदीपक अद्वितीय कार्याचा वार्षिकांक दस्तऐवजच आहे,असे कौतुक सर्वांनी केले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उन्मेष वार्षिकांकाचे मुख्य संपादक प्रा.मेघा पंडित यांनी मानले.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेतंर्गत असलेल्या सर्वच महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य,पर्यवेक्षक,कार्यालयीन अधीक्षक,प्राध्यापक,कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व प्रत्येक महाविद्यालयांच्या वार्षिकांकाचे मुख्य संपादक व संपादक मंडळातील सर्व सदस्य आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## तनमनाच्या स्वास्थ्यासाठी स्क्रीन टाइम कमी करा - डॉ. आशिष चेपूरे

**लातूर/प्रतिनिधी :** सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात स्क्रीनचा वापर पूर्णपणे टाळता येणार नाही. मात्र त्यावर नियंत्रण आणले नाही तर आपले शरीर आणि मन यांचं स्वास्थ्य बिघडते. यावरचा उत्तम उपाय म्हणजे स्क्रीन टाईम कमी करणे. असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आशिष चेपूरे यांनी केले. येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयात झालेल्या डिजिटल डिटॉक्स या कार्यक्रमात ते बोलत होते. किशोरवयीन मुलांमध्ये स्क्रीनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्यांच्या शारीरिक,मानसिक स्वास्थ्यावर आणि अभ्यासावर परिणाम होत आहे. हे लक्षात घेऊन विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तसेच ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर सरांच्या पुढाकाराने डिजिटल डिटॉक्स कार्यक्रम झाला.




डिजिटल डिटॉक्स म्हणजे मोबाईल, टॅबलेट सोशल मीडिया, इतर डिजिटल उपकरणांचा वापर जाणूनबुजून कमी करणे किंवा थांबवणे. ऑनलाईन जगातून बाहेर पडून ऑफलाइन जगात अधिक सहभागी होणे. हे सारे समजावून देण्यासाठी डॉक्टर चेपूरे यांनी स्लाईडस, रुग्णाचे अनुभव, विद्यार्थ्यांशी संवाद विद्यार्थ्यांकडून प्रसंग सादर करवून घेतला. भवताल पहा, लोकांचा सहवास मिळवा असे डॉक्टरांनी आवर्जून सांगितलं. कार्यक्रमाच्या प्रारंभी अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतनजी सारडा यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे सचिव कमल किशोरजी अग्रवाल, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, राहूल पांचाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहशिक्षिका भाग्यश्री पोतदार यांनी केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव

## ३० सप्टेंबर पर्यंत नऊ दिवस,नऊ रूप,नऊ अनुभव भक्ती,संगीत,नृत्याचा दिव्य सोहळा



धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीचा शारदीय नवरात्र महोत्सव यंदा भक्तिभाव,सांस्कृतिक विविधता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधणारा ठरणार आहे.२२ ते ३० सप्टेंबर या कालावधीत संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत होणाऱ्या या सोहळ्यात ख्यातनाम कलाकारांच्या उपस्थितीत भक्ती,संगीत व नृत्याचा अद्वितीय उत्सव साजरा होणार आहे.

महोत्सवातील खास आकर्षण- २२ सप्टेंबर : इंडियन आयडॉल फेम रोहित राऊत यांचा भक्तिसंगीत व ऑर्केस्ट्रा.२३ सप्टेंबर : पं.जयतीर्थ मेकुंडी यांची शास्त्रीय संगीत संध्या.२४ सप्टेंबर : अभिजीत जाधव यांची लोकसंगीत मैफल.२५ सप्टेंबर : फोक लोक स्टुडिओचे लोकसंगीत सादरीकरण.२६ सप्टेंबर : शाहीर रामानंद उगले यांचा लोककला जल्लोष.२७ सप्टेंबर : रसिकर्पण डान्स अकॅडमीचे लोकनृत्य सादरीकरण. २८ सप्टेंबर : राणा जोगदंड यांची लोकसंगीत मैफल.२९ सप्टेंबर : नवरात्र थीमवरील ३०० ड्रोनद्वारे लाईट शो.३० सप्टेंबर : फोक आख्यानाची भव्य लोकसंगीत मैफल होणार आहे.

प्रेरणादायी सांस्कृतिक व लोककला कार्यक्रम. ख्यातनाम कलाकारांचा सहभाग. भक्ती, संगीत व नृत्याचा आधुनिकतेच्या स्पर्शासह संगम होणार आहे.हा भव्य सोहळा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून,सर्व कार्यक्रमांचे आयोजन श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय,तुळजापूर येथे होणार आहे.

मंदिर संस्थानने सर्व भाविकांना आवाहन केले आहे की,नऊ दिवस,नऊ रूप,नऊ अनुभव या संकल्पनेवर आधारित या महोत्सवात सहभागी होऊन दैवीकृपेचा अनुभव घ्यावा आणि सांस्कृतिक व आध्यात्मिक सोहळ्याचा अविभाज्य भाग व्हावे. अधिक माहितीसाठी ९४०३१४८४८४ या क्रमांकावर साधावा.

# उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शिष्यवृत्ती योजनांचे प्रवेश वेळापत्रक जाहीर

धाराशिव,दि.२१ सप्टेंबर (जिमाका.) इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना यांचे प्रवेश वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

शासकीय वसतिगृह असलेल्या जिल्ह्यांसाठी वेळापत्रक -अर्ज १९ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०२५ दरम्यान सादर करावा.अर्ज छाननी ३० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आहे.पहिली निवड यादी ६ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल.पहिल्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत १६ ऑक्टोबर २०२५ आहे.दुसरी निवड यादी १७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल.दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ आहे.

शासकीय वसतिगृह उपलब्ध नसलेल्या जिल्ह्यांसाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

अर्ज कालावधी : १९ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान तर अर्ज छाननी : १ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आहे.पहिली निवड यादी : १० नोव्हेंबर २०२५ प्रसिद्ध होईल.पहिल्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर २०२५ आहे.दुसरी निवड यादी २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : २८ नोव्हेंबर २०२५ आहे.

सर्व अर्ज ऑनलाइन पद्धतीने https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर करावेत.इयत्ता १२ वी नंतर व्यावसायिक पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळणार आहे. जिल्ह्यात १०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले शासकीय वसतिगृह सन २०२४ -२५ पासून सुरू करण्यात आलेले आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार अर्ज करून लाभ घ्यावा,असे आवाहन श्री.अमोल ताकभाते,सहाय्यक संचालक, मागास बहुजन कल्याण कार्यालय, धाराशिव यांनी केले आहे.

# स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत क्षय रुग्णांना पौष्टिक आहार किट वाटप

धाराशिव, (जिमाका)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत देशभर राबविण्यात येत असलेल्या स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत धाराशिव येथे विशेष आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या शिबीरात क्षयरोग मुक्तीची शपथ घेण्यात आली.तसेच क्षयरोग रुग्णांना उपचार काळात पौष्टिक आहाराची मदत मिळावी या उद्देशाने पोषण आहाराच्या फूड बास्केटचे वाटप धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चव्हाण,जिल्हा चिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तानाजी लाकाळ,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बांगर,स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ.स्मिता गवळी,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत बनसोडे यांच्यासह अनेक वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.या उपक्रमातून क्षयरोगमुक्त भारताच्या उद्दिष्टपूर्तीकडे धाराशिव जिल्ह्याने महत्वाचे पाऊल टाकले आहे.

# राष्ट्रीय विधी सेवा दिनानिमित्त छायाचित्रण व कला प्रदर्शनाचे आयोजन

धाराशिव (जिमाका.) राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या स्थापनेला यंदा ३० वर्षे पूर्ण होत असून,त्या निमित्ताने तसेच ८ नोव्हेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय विधी सेवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांचा भाग म्हणून राष्ट्रीय छायाचित्रण व कला प्रदर्शनाचे आयोजन ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे.या प्रदर्शनात छायाचित्रे,रेखाचित्रे तसेच १ मिनिटापर्यंतचे व्हिडिओ सादर करता येणार आहेत. लोकांना सक्षम बनविणे आणि सर्वांसाठी न्यायाची उपलब्धता सुनिश्चित करण्यामध्ये विधी सेवेची भूमिका अधोरेखित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्यावतीने अधिनस्त कार्यालये,कर्मचारी तसेच इच्छुक नागरिकांना या प्रदर्शनात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.इच्छुकांनी आपली छायाचित्रे/रेखाचित्रे/व्हिडिओ (१ मिनिट) २५ सप्टेंबर २०२५ पूर्वी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयात पाठवावीत,असे सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश धारास यांनी कळविले आहे.

# मुरूम मंडळात अतिवृष्टीचा तडाका.... खरिपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान.... शेतकरी बांधव अडचणीत....

मुरूम (सुधीर पंचगल्ले)महाराष्ट्रासह देशभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या तडाख्याने जनजीवन विस्कळीत झाले असून धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील मुरुम शहर व परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने हाहाकार माजवला आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून जनजीवन पूर्णतः ठप्प झाले आहे. गेल्या आठवड्यात आलूर परिसरात झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे शेतकऱ्यांनी शेतात काढून ठेवलेली पिके संपूर्ण वाहून गेली. तर कदेर परिसरासह मुरुम परिसरातील गडीशिवार, खारोळी यांसह अनेक ठिकाणी पावसाने मोठा धुमाकूळ घातला आहे. मुरुमजवळील बेनीतुरा साठवण तलाव प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्याने सांडपाण्यातून येत असलेल्या पाण्यामुळे नदीकाठावरील शेतकऱ्यांचे शेतमाल व पिके वाहून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

शनिवारी व रविवार या दोन (ता. २० व २१) दिवशी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे मुरुम शहरातील किसान चौक ते आष्टा कासार मार्गावरील प्रमुख पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागले. परिणामी नागरिक, शाळकरी विद्यार्थी, नोकरदार व व्यावसायिकांना प्रवासासाठी ७ किमी अंतराऐवजी तब्बल ३०-३५ किमी वळसा घ्यावा लागत आहे. तसेच मुरुम-अक्कलकोट मार्गावरील बेळंबजवळील पुलावरून देखील मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागल्याने वाहनांची मोठी गर्दी झाली. परिणामी मुरूम अक्कलकोट मार्गावरील सर्वच वाहतूक सेवा पूर्णता बंद करण्यात आली होती पुलावरील पाणी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली. काही तरुणांनी मात्र धोकादायक टवाळक्या करत पाण्याचा मोठा प्रवाह पार करण्याचा प्रयत्न केल्याचेही दिसून आले.



दरम्यान, या परिस्थितीची दखल घेत मुरुम शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मात्र संपूर्ण घटनेने आक्रमक होत पहाटेपासूनच घटनास्थळी दाखल झाले. महसूल, कृषी, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पोलिस प्रशासनाशी संपर्क साधत पंचनामे व पाहणी करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना तात्काळ व सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली, त्यावेळी शेतकऱ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी तहसील प्रशासनाविरोधात मात्र शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सुर उमटला आहे. उमरगा तालुक्याचे तहसीलदार गोविंद येरमे हे दोन दिवसापूर्वी स्थानिक नेत्यांच्या वाहनातून पाहणी दौऱ्यात सहभागी झाले होते. त्यांनी पत्रकारांशी बोलताना मुरुम महसूल मंडळात अतिवृष्टी झाली नाही असे वक्तव्य केल्याने संतापाची लाट उसळली आहे. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष नुकसानीकडे बोट दाखवत तहसीलदारांवर रोष व्यक्त केला. सध्या शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून शासनाने तातडीने लक्ष घालून नुकसानग्रस्तांना मदत द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादीने दिला आहे यामध्ये राष्ट्रवादीचे जिल्हाचिटणीस दत्तात्रय इंगळे, युवक शहराध्यक्ष बाबा कुरेशी, लखन भोंडवे, इमरान सय्यद, जावेद ढोबळे किशोर शिंदे, बालाजी मंडले यांच्यासह अनेक राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता.


# लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


# धाराशिवमध्ये तेरणा हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर - ८५२ नागरिकांना लाभ



धाराशिव, (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या वतीने तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, नेरूळ (नवी मुंबई) यांच्या सहकार्याने धाराशिव शहरात भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात हृदयरोग, नेत्ररोग, बालरोग, स्त्रीरोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, अस्थिरोग, पोटाचे विकार अशा विविध आजारांवरील तपासणी व औषधोपचार करण्यात आले. नेरूळ येथील तेरणा हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर्स शिबिरासाठी खास उपस्थित राहून रुग्णांची तपासणी केली.

आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले की, ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे, त्यांचे पुढील उपचार नेरूळ येथील तेरणा हॉस्पिटलमध्ये मोफत केले जाणार आहेत. तसेच, जे उपचार तेरणा हॉस्पिटलमध्ये शक्य होणार नाहीत, ते मुंबईतील जे.जे. आणि केईएम सारख्या नामांकित रुग्णालयांत करण्यात येणार आहेत.

या शिबिरातून एकूण ८५२ रुग्णांनी लाभ घेतला.

हे शिबिर प्रभाग क्रमांक १७, गाझी स्कूल, खाजा नगर, शम्स चौक, धाराशिव (उस्मानाबाद) येथे आयोजित करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी सुनील काकडे, विनोद गपाट, आबा इंगळे, राजसिंह राजे निंबाळकर, अक्षय ढोबळे, अलीम पठाण, पटेल सर, पुष्पकात मळाळे, विलास लोंढे, जोशी, आकाश तावडे, विशाल पाटील, नाईकवाडी, बिलाल रजवी, इलियास पिरजादे, फहाद सिद्दिकी, शहबाज पठाण, मुजाहिद काझी यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुण्यांचे भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा शहराध्यक्ष फर्मान काझी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी फिरोज पठाण, सुरज सैलानी, महमूद मुजावर, जाकीर पठाण, फरहान काझी, कैफ पठाण, अमजद सय्यद, रेहान काझी, बब्बू मुजावर, समीर शेख, समीर बेग, मुजाहिद शेख यांनी मोलाचे सहकार्य केले. तर आरिफ मुजावर, जैनू मुजावर, काझी अबूहुरेरा, काझी सुद, सय्यद सेहेल, अल्ताफ शेख आदींनीही शिबिरासाठी विशेष परिश्रम घेतले.

सदरील शिबिर हे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळखले जाणारे तसेच भारतीय जनता पक्ष अल्पसंख्यांक सेल धाराशिव शहराध्यक्ष फर्मान काझी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाले.

# अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिससाकडून समजलेली माहिती अशी की, फयाज शेख, वय ३२ वर्षे, रा. दर्गा रोड इस्लामपूरा धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.२०.०९.२०२५ रोजी वडगाव सि ते वरवंटी रोडवर महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ राजनिवास पान मसाला सुंगधी सुपारी, मोटरसायकल क्र एमएच २५ बीडी ४५६५ वाहनासह असे एकुण ७१,५०२ किंमतीचे विक्री करीत जवळ बाळगलेला असताना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- १२३, २२३, २७४, २७५, भा.न्या.सं. सह अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलम ५६ अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649